चला स्विमिंग ला...
स्विमिंग सुट, गॉगल, स्विमिंग कॅप, बरमुडा स्विमिंग लेगींग्ज टॉप, व बरेच काही
जरीवाला
कापड बाजार, फोन नं. 7666510765
यशोदानगर, पाईपलाईन रोड,
सिंहगड रोड, त्रिमुर्ती हॉस्पिटल जवळ, योगेश मेडीकल शेजारी, पुणे. मो. 7775089505

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

संत राजिन्दर सिंह जी महाराज
यांच्या पावन सानिध्यात
मंगळवार, मार्च, 31/2026
संगत दर्शन - सायं 7 वाजता
बुधवार, एप्रिल, 1/2026
सत्संग - सायं 7 वाजता
नामदान (दिक्षा) - रात्री 9 वाजता
मिस्कीन मळा, गंगा उद्यान शेजारी, मिस्कीन नगर, सावेडी, अहिल्यानगर - 414003
7071050505/9067894213

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, गुरुवार दि. २६.०३.२०२६ | अंक नं. २९५ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

स्वप्नवत ऑफर... स्वप्नवत सफर...
१०१ भाग्यवंत जोडप्यांना चक्क FREE हनिमून टूर
1 डिसेंबर 2025 ते 31 मे 2026
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अहिल्यानगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

समता पतसंस्था
नो रिस्क, रिटर्न्स फिक्स
११००+ कोटींच्या ठेवी
ठेवींवर मिळवा १०% पर्यंतचे व्याज
लिक्विडिटी बेस प्रोटेक्शन स्कीम
अंतर्गत ठेवीदारांच्या ठेवी, पूर्णपणे सुरक्षित.
संपर्क : ७७२२ ०१० २२२
४० वर्षे ग्राहकांच्या विश्वासाची!

फॉर्मिंग (1 ग्रॅम) मधील व आकर्षक फॅशन ज्वेलरीमध्ये
गंठन, राणीहार, नेकलेस, बांगड्या, टॉप्स, बिंदी, साडीपीन मधील असंख्य व्हरायटी रू. 999/- पासुन सुरु
चंदुकाका ज्वेल्स
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
सर्वात कमी भाव, सर्वात कमी मजुरी.
22 कॅरेट सोन्याच्या दागिन्यांची प्रतीग्रॅम मजुरी ₹888/-

SONI TILES AND MARBLE INDUSTRIES Since 1965
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अॅण्ड मार्बल इंडस्ट्रिज
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720 Mob. 9372497999

महेंद्र पेडावाला
रजवाडी गुजराती थाळी
स्पेशल आमरस 400/- किलो
रेल्वे पार्सल, किटी पार्टी व बर्थडे पार्टीसाठी खास सोय
पार्सल सुविधा उपलब्ध..
कापड बाजार, अहिल्यानगर.

दुमजली घर विकणे
बालिकाश्रम रोड, लक्ष्मीमाता मंदिराजवळ, तुलसीपार्क समोर, जाधव मळा, अहिल्यानगर
संपर्क वेळ- सायं. ५ ते ८
9730292394

# सोशल मिडियावरील अफवेमुळे पंपावर रांगा; ‘काही पंप बंद तर काही ठिकाणी पेट्रोल संपले’

नगर - सोशल मीडियावर आलेल्या अफवेमुळे लोकांनी पेट्रोल पंपांवर रांगा लावून गरजेपेक्षा जास्त पेट्रोल, डिझेल घेवून साठेबाजी केली आणि पेट्रोल पंपावरील स्टॉक संपला. आता कंपनीकडे आगाऊ पैसे भरुनही टँकर उपलब्ध होत नाही. त्यामुळे पेट्रोल पंप अक्षरशः बंद ठेवण्याची वेळ आली आहे, अशी माहिती अहिल्यानगर पेट्रोल पंप असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. स्वाधीन गाडेकर यांनी दिली.



जिल्ह्यात सध्या सर्वत्र पेट्रोल मिळत नसल्याची बोंब उठली आहे. पंपांसमोर मोठ्या रांगा लागत आहेत. अनेक पेट्रोल पंप बंद आहेत. लॉकडाऊन लागणार असल्याची अफवा सोशल मीडियावरुन पसरल्यानंतर लोकांनी जास्तीचे पेट्रोल घेण्यासाठी पंपांवर गर्दी केली. त्यामुळे पूर्वीचा स्टॉक संपला. पण नवीन स्टॉक न आल्यामुळे काही पेट्रोल पंप तीन-तीन दिवसांपासून बंद ठेवण्याची वेळ आली आहे. अहिल्यानगर जिल्ह्यात सुमारे ४०० पेट्रोल पंप आहेत. त्यातील १५० पेक्षा अधिक पेट्रोल पंप पेट्रोलचा साठा संपल्यामुळे बंद पडले आहेत. तर अनेक पेट्रोल पंपांसमोर मोठ्या प्रमाणात रांगा लागलेल्या आहेत.

सरकारकडून पेट्रोल, डिझेलबाबत टंचाई नसल्याचे सांगण्यात आले आहे. तरीही लोकांच्या रांगा कमी होताना दिसत नाहीत. पुरवठ्यापेक्षा मागणी अधिक वाढली. त्यामुळे अनेक पेट्रोल पंपांवरील स्टॉक एका दिवसात संपला. प्रत्येक पंपासाठी कंपनीकडून कोटा ठरवून दिलेला असतो. मार्च २०२५ रोजी संबंधित पेट्रोल पंपावरील विक्रीचे आकडे पाहून त्यात १० टक्के वाढ करुन मार्च २०२६ चा कोटा त्या पेट्रोल पंपासाठी ठरविला जातो. त्यानुसार टँकरच्या फेऱ्या निश्चित केल्या जातात. मात्र, अचानक मागणी वाढली अन् पंपावरील स्टॉक संपला. मात्र, आता दुसरा टँकर येण्यासाठी त्याची जी वेळ ठरलेली आहे, त्यापूर्वीच मागणी नोंदवली गेली. त्यामुळे दुसरा टँकर मिळायला उशिर होत असल्याचे कंपनीच्या विक्री अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले.

## क्रेडीट सिस्टीम बंद

ऑईल कंपन्यांकडून पेट्रोल पंप चालकांसाठी क्रेडीट सिस्टीम लागू केली होती. मात्र, आता डॉलरचे भाव वाढल्यामुळे कंपन्यांचीही आर्थिक गणिते बिघडली आहे. पेट्रोल, डिझेल घेताना कंपन्यांना डॉलरमध्ये पैसे मोजावे लागतात. परिणामी कंपन्यांनी पूर्वीची क्रेडिट सिस्टीम पूर्ण बंद केली आहे. त्यामुळे आता पेट्रोल पंप चालकांना अगोदार पैसे भरुन टँकर मागवावे लागतात. मात्र, काही कंपन्यांना तीन-तीन दिवस आगाऊ पैसे भरुनही टँकर उपलब्ध होत नाहीत, असेही चित्र आहे. पेट्रोल, डिझेल पुरवठा करणारे टँकर दोन प्रकारचे आहेत. एक १२ हजार लिटरचा आणि दुसरा २० हजार लिटरचा. या दोन्ही टँकरनुसार आणि कंपन्यांनुसार आकारले जाणारे शुल्कही वेगवेगळे असते. ते पेट्रोल पंप चालकांना अगोदर भरावे लागते.

## तीन दिवस जाणारा टँकर एका दिवसात संपतोय

सर्वसाधारणपणे २० हजार लिटरचा टँकर एका पेट्रोलपंपासाठी तीन दिवस पुरत होता. त्यामुळे अशा पेट्रोलपंप चालकाला तीन दिवसानंतर दुसरा टँकर मिळत होता. मात्र, अचानक लोकांनी पेट्रोल पंपावर गर्दी करायला सुरुवात केल्यामुळे २० हजार लिटरचा टँकर एका दिवसात संपतोय. मग पुन्हा दुसरा टँकर यायला तीन दिवसांची वाट पहावी लागते. अशा पद्धतीने टंचाईसदृश परिस्थिती निर्माण होत आहे. ही परिस्थिती लोकं निर्माण करीत आहेत. त्यामुळे लोकांनी गरजेपुरतेच पेट्रोल, डिझेल भरावे, असे आवाहन हिंदुस्तान पेट्रोलियम कंपनीच्या विक्री अधिकाऱ्यांकडून करण्यात आले आहे.

## पैसे भरले, पण टँकर आला नाही

पेट्रोल टँकरसाठी तीन दिवसांपूर्वी पैसे भरले आहेत. अनेक डीलरने आगाऊ पैसे भरले आहेत. पण कंपन्यांकडून पुरवठा होत नाही. टंचाई नाही. पण मागणी वाढल्यामुळे पुरवठ्याचे वेळापत्रक बिघडले आहे. कंपन्या रोज सांगतात की आज येईल, उद्या येईल. पण अजून टँकर आलेले नाहीत. त्यामुळे पेट्रोल पंप बंद ठेवावे लागत आहेत, असे अहिल्यानगर पेट्रोल पंप असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. स्वाधीन गाडेकर यांनी सांगितले.

गौरव मानाचा
आम्हाला सदैव अभिमानाचा
वाहन उद्योग क्षेत्रातील अतुलनीय योगदानाबद्दल पुण्यभूषण संस्था, पुणे यांच्यातर्फे देण्यात येणारा
‘पुण्यभूषण पुरस्कार’
संस्थेचे अध्यक्ष तथा प्रसिद्ध उद्योजक
डॉ. अभयजी फिरोदिया
यांना मिळाल्याबद्दल हार्दिक अभिनंदन!
सर्व पदाधिकारी-विश्वस्त मंडळ व सल्लागार मंडळ, मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी
अहमदनगर एज्युकेशन सोसायटी
• अहिल्यानगर •

भावपूर्ण श्रद्धांजली
कै. शिवाजी आण्णा गोंधळे
स्व.दि. २३/०३/२०२६
आपली नम्रता, सेवा, प्रेमळपणा, व शिस्तप्रिय जीवन सदैव आठवणीत राहील.
आपल्या पावन स्मृतीस भावपूर्ण श्रद्धांजली.
दुःखांकित
श्री सिध्देश्वर तरुण मंडळ
जंगुभाई तालीम ट्रस्ट
सर्व सभासद व कार्यकर्ते अहिल्यानगर

रक्तदान सर्वश्रेष्ठ दान..
राष्ट्रसंत आचार्यसम्राट पुज्य श्री आनंदऋषिजी महाराज साहब यांच्या स्मृतिदिना निमित्त
भव्य रक्तदान शिबीर
आपणही करा.. इतरांनाही सांगा
रक्तदान शिबीर शनिवार, दि. २८ मार्च २०२६ रोजी सकाळी ९ ते ५
स्थळ : भक्त निवास, आनंद धाम, अहमदनगर
सौजन्य
चंदनमल केशरचंद मुनोत (नेवासकर) मेडिकल ट्रस्ट

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# बंदी असलेल्या गुटख्याची वाहतूक करणारा जेरबंद

**सिद्धीबाग परिसरात पोलिसांची कारवाई, ४२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त**

नगर – राज्य शासनाने विक्रीस प्रतिबंध घातलेल्या पानमसाला आणि सुगंधित तंबाखूची चोरटी वाहतूक करणाऱ्या एका तरुणाला तोफखाना पोलिसांनी अटक केली आहे. सिद्धीबाग परिसरात करण्यात आलेल्या या कारवाईत पोलिसांनी ४२ हजार २९२ रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

२५ मार्च रोजी दुपारी तीन वाजेच्या सुमारास सिद्धीबागेकडून जगुभाई तालीम कडे जाणाऱ्या रस्त्यावर संशयित इसम शेरअली आरीफ तांबोळी (वय २५, रा. व्यापारी मोहल्ला) हा पांढऱ्या रंगाच्या दुचाकीवरून जात होता. तोफखाना पोलीस स्टेशनचे पोलीस कॉन्स्टेबल सुजय हिवाळे यांनी त्याला थांबवून झडती घेतली असता, त्याच्याकडे विमल, हिरा, डायरेक्टर असा विविध कंपन्यांचा गुटखा आणि तंबाखूचे पाकीट मिळून आले.

स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी मानवी शरीरास अपायकारक असलेला हा साठा तो विक्रीसाठी घेऊन जात असल्याचे निष्पन्न झाले आहे. पोलिसांनी गुटख्यासह ३० हजार रुपये किमतीची दुचाकी जप्त केली आहे. या प्रकरणी तोफखाना पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला असून, पोलीस निरीक्षक जगदीश भांबळ यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक मंगेश गोंटला पुढील तपास करत आहेत.

# बॉटल, कॅनमध्ये पेट्रोल, डिझेल मागितल्यास किंवा विकल्यास फौजदारी कारवाई; दुचाकीला २०० तर चारचाकी वाहनांसाठी २ हजार रुपयांची मर्यादा : जिल्हाधिकारी

नगर – समाजमाध्यमांवर पेट्रोल, डिझेलच्या विक्रीमध्ये तुटवडा निर्माण होणार असल्याच्या अफवा पसरत असल्याच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी आणि संभाव्य साठेबाजीवर नियंत्रण आणण्यासाठी पेट्रोलसारख्या ज्वलनशील पदार्थाची खुल्या स्वरूपात म्हणजे बॉटल किंवा कॅनमध्ये विक्री न करण्याचे आदेश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी जारी केले आहेत. तसेच या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर थेट फौजदारी कारवाई करण्याचा इशारा जिल्हाधिकाऱ्यांनी दिला आहे.

तर दुचाकी वाहनांसाठी एका वेळी जास्तीत जास्त २०० रुपये तर चारचाकी वाहनांसाठी २ हजार रुपयांचे पेट्रोल भरता येणार आहे, असेही या आदेशात म्हटले आहे.



पेट्रोलियम नियम, २००२ मधील तरतुदी विचारात घेऊन पेट्रोल किंवा डिझेल हे खुल्या प्लास्टिक बाटलीत किंवा अनधिकृत कंटेनरमध्ये पेट्रोल पंपावरून भरून देणे व विक्री करणे नियमबाह्य आणि बेकायदेशीर असल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे. या अधिकाराचा वापर करून जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी जिल्ह्यातील सर्व पेट्रोल पंपांसाठी काही नियम लागू केले आहेत.

आदेशानुसार, जिल्ह्यातील सर्व पेट्रोल पंप चालक व मालक यांनी पेट्रोल किंवा डिझेल हे केवळ वाहनाच्या इंधन टाकीतच वितरित करावे. कोणत्याही परिस्थितीत कॅन, बाटली, डबा किंवा इतर कोणत्याही खुल्या भांड्यात पेट्रोल, डिझेलची विक्री किंवा पुरवठा करू नये. तसेच पेट्रोल पंप परिसरात सीसीटीव्ही यंत्रणा कार्यरत ठेवून विक्रीची नोंद नियमित ठेवणे बंधनकारक करण्यात आले आहे.

या आदेशाचे काटेकोर पालन करण्याची जबाबदारी संबंधित पेट्रोल पंप मालक व व्यवस्थापक यांच्यावर राहणार आहे. हा आदेश तात्काळ प्रभावाने लागू असून पुढील आदेश येईपर्यंत लागू राहणार आहे.

दरम्यान, या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्ती किंवा संस्थेविरुद्ध दंडात्मक व फौजदारी कारवाई करण्यात येणार असल्याचा इशाराही जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिला आहे.

# गॅस टंचाई नाही; मग पहाटेपासून सिलिंडरसाठी रांग कशी?



२६ मार्च रोजी सकाळी पहाटे ५ वाजल्यापासून ममता गॅस एजन्सीसमोर गॅस सिलिंडरसाठी रांगेत उभे राहिलेले नगरकर.

नगर – घरगुती गॅस सिलिंडरची टंचाई नाही. साठा मुबलक आहे. पूर्वीप्रमाणेच एजन्सींना पुरवठा होत आहे, असे गॅस कंपन्यांपासून प्रशासनापर्यंत सर्वजण सांगत आहेत. मात्र, गॅस एजन्सीसमोरील रांगा कमी होताना दिसत नाहीत. लोक पहाटेपासून गॅससाठी रांगा लावत आहेत. या रांगा का लागत आहेत, याचे उत्तर मात्र कोणाकडेच नाही. विशेष रांगेतील सर्वांनाच गॅस सिलिंडर मिळतो, असेही नाही. अनेकजण रिकामे सिलिंडर घेवून परत जातात. त्यांना पुन्हा दुसऱ्यादिवशी रांगेत उभे रहावे लागण्याची वेळ येते, असे का? असा सवाल आता या रांगा उपस्थित करु लागल्या आहेत.

२६ मार्च रोजी सकाळी नगर शहरातील गुलमोहर रोडवरील कोहिनूर मंगल कार्यालयाशेजारी असलेल्या ममता गॅस एजन्सी येथे गॅस सिलिंडरसाठी पहाटे पाच वाजल्यापासून नागरिकांनी रांगा लावल्याचे दिसून आले. एका दिवसात केवळ तीनशे गॅस सिलिंडरचे वितरण केले जाते. उर्वरित लोकांना दुसऱ्या दिवशी बोलवले जाते. पहिल्या दिवसातील शिल्लक लोकं आणि दुसऱ्या दिवशी नव्याने आलेले लोकं यांच्यामुळे ही रांग वाढत जाते, असे रांगेत आलेल्या लोकांचे म्हणणे आहे. मात्र, प्रशासन यावर काहीही तोडगा काढत नाही.

औद्योगिक व व्यावसायिक गॅसचा तुटवडा आहे. केंद्र सरकारने जीवनाश्यक वस्तू अधिनियम लागू केला आहे. त्यामुळे घरगुती गॅसला प्राधान्य देवून औद्योगिक व व्यावसायिक गॅसचा पुरवठा थांबवलेला आहे. एजन्सी चालकांना पूर्वीप्रमाणे पुरवठा होत नाही. अनेक एजन्सी चालकांचे क्रेडिट संपलेले आहे. काही एजन्सी चालकांना रोखीने सिलिंडर घ्यावे लागत आहेत. त्यामुळे एजन्सीवाले जेव्हढी कॅश आहे, तेव्हढेच सिलिंडर मागवत आहेत. परिणामी रांगा लागत असल्याचे आणि तुटवड्याचे चित्र निर्माण होत असल्याचे एका एजन्सी चालकाने नाव न घेण्याच्या अटीवर सांगितले.

घरगुती गॅस सिलिंडरचा तुटवडा नाही. पूर्वीसारखा पुरवठा होत आहे. पण लोकं पहिली टाकी संपली की लगेच दुसरी घेण्यासाठी रांग लावतात. काहीजणांकडे एकच सिलिंडर असल्यामुळे ते संपले की तेदेखील रांगेत लागतात. त्यामुळे ज्यांना खरी गरज आहे, असेही रांगेत असतात आणि ज्यांना केवळ घेवून ठेवायची आहे, असेही रांगेत असतात. त्यामुळे एजन्सीसमोर रांगा लागत आहेत, असे जिल्हा पुरवठा अधिकारी हेमा बडे म्हणाल्या.

गॅस टंचाई आहे. लोकांनी गॅस जपून वापरा. पर्यायी साधनांचा वापर करा. एजन्सीसमोर रांगा लावू नका. लिमिटेड पुरवठा होत आहे. त्यामुळे ऑनलाईन बुकींग झाल्यानंतर तुम्हाला ज्या तारखेला सांगितले जाते, त्याच दिवशी गॅस सिलिंडर घेण्यासाठी या, असे प्रशासनाने लोकांना स्पष्टपणे सांगावे. लोकांना गॅस टंचाई नाही, असे सांगून मुर्खात काढणे बंद करावे. लोकं पहाटे पाच वाजल्याशिवाय रांगेत उभे राहत आहेत आणि तरीही सिलिंडर मिळत नाही, हे का? अशी प्रतिक्रिया प्रशांत जाधव यांनी दिली.

# जिल्ह्यात पेट्रोल, डिझेलचा मुबलक साठा; अफवांवर विश्वास ठेवू नये : जिल्हाधिकारी

नगर – अहिल्यानगर जिल्ह्यात पेट्रोल, डिझेल व गॅसचा मुबलक साठा उपलब्ध आहे. सध्या सोशल मीडिया व व्हॉट्सपवर इंधन तुटवड्याबाबत पसरवल्या जाणाऱ्या बातम्या पूर्णपणे खोट्या व दिशाभूल करणाऱ्या आहेत. नागरिकांनी अशा कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, पॅनिक होऊन पेट्रोल पंपांवर विनाकारण गर्दी करू नये, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी केले आहे.

२५ मार्च रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या अध्यक्षतेखाली, पोलीस अधीक्षक व पुरवठा विभागाच्या सर्व अधिकाऱ्यांसोबत एक महत्त्वपूर्ण आढावा बैठक पार पडली. जिल्ह्यात पेट्रोल, डिझेल किंवा गॅसचा तुटवडा असल्याचा खोटा मेसेज किंवा चुकीची माहिती पसरवणे हा कायद्याने दंडनीय अपराध आहे. जे लोक अशी बेकायदेशीर कृत्ये करून नागरिकांमध्ये घबराट निर्माण करत आहेत, त्यांच्याविरुद्ध पोलीस विभागाच्या समन्वयाने थेट गुन्हे दाखल करून कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा सक्त इशारा या बैठकीत प्रशासनाकडून देण्यात आला आहे.

प्रशासनाने दिलेल्या अधिकृत आकडेवारीनुसार जिल्ह्यातील इंधन साठ्याची वस्तुस्थिती अत्यंत सम ाधानकारक आहे. पेट्रोलची जिल्ह्याची दररोजची गरज ३०८ किलोलिटर इतकी असून, सध्या ८४६ किलोलिटर इतका मुबलक साठा उपलब्ध आहे. तसेच, डिझेलची दररोजची गरज ६८९ किलोलिटर असताना, सध्या १४७१ किलोलिटर इतका साठा उपलब्ध आहे. याशिवाय, प्रमुख तेल कंपन्यांकडून इंधनाचा नियमित पुरवठा विनाअडथळा सुरू असल्याने तुटवड्याची कोणतीही शक्यता नाही. जिल्ह्यात कोणत्याही प्रकारचा इंधन तुटवडा निर्माण झालेला नसल्यामुळे नागरिकांनी इंधनाची अनावश्यक साठेबाजी करू नये. खोट्या अफवांवर विश्वास ठेवून विनाकारण पेट्रोल पंपांवर रांगा लावणे टाळावे. इंधनाचा पुरवठा नियमितपणे सुरू असल्याने नागरिकांनी शांतता व संयम राखून जिल्हा प्रशासनास आवश्यक ते सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी कार्यालय, अहिल्यानगर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## बसस्थानकाबाहेरून मोटारसायकलची चोरी

नगर – शहरातील पुणे बस स्थानकाच्या बाहेर उभी केलेली होंडा कंपनीची शाईन मोटारसायकल (क्रं.एम.एच.४४ एएफ ६३९९) अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना १९ मार्च रोजी सकाळी ९ ते १० या कालावधीत घडली आहे. याबाबत रवि रमेश चव्हाण (वय २१, रा. केकत पांगरी, ता. गेवराई, जि. बीड) यांनी २५ मार्च रोजी कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून पोलिसांनी अज्ञात चोरट्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०५ (बी) अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

## छायाबाई पोखर्णा यांचे अल्प आजाराने निधन

नगर – छत्रपती संभाजीनगर येथील रहिवासी सौ. छायाबाई रतिलाल पोखर्णा (वय ६६) यांचे २५ मार्च रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर संभाजीनगर अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.




त्यांच्या मागे पती, १ मुलगा, २ मुली, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. रतीलाल माधवलाल पोखर्णा यांच्या त्या पत्नी, प्रितम, प्रिया, पूजा भळगट यांच्या मातोश्री तर वालचंद, माणीकचंद, सुनील पोखर्णा यांच्या वहिनी होत.

## पुष्पाबाई मुनोत यांचे अल्प आजाराने निधन

नगर – नांदेड येथील रहिवासी श्रीमती पुष्पाबाई कन्हैयालाल मुनोत (नांदेडवाला) (वय ७५) यांचे २५ मार्च रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर २६ मार्च रोजी नांदेड अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे २ मुले, १ मुलगी, सुना, नातवंडे, जावई असा परिवार आहे. निलेश, परेश मुनोत यांच्या त्या मातोश्री होत.

**हनुमान चालिसा पाठ**

**शुक्रवार दि. २७/३/२०२६**
**रात्री ८.३० ते १०.३०**

**श्री दक्षिणमुखी हनुमान सत्संग मंडळ, सर्जेपुरा, अहिल्यानगर**

**सह्योग प्रतिष्ठाण मित्र मंडळ,** प्लेझेंट पार्क शेजारी, सारसनगर, राजेंद्र आवारे ९४२२२२२३७३, संजय आवारे ९४२२०८०३६६

**मंगल भक्त सेवा मंडळ, मंगल दत्तक्षेत्र, एम.आय.डी.सी.**

**सौ. शारदा संजय तायडे,** साईनाथ मंदिर, पै. छबू लांडगे तालीम जवळ, सर्जेपूरा, सौ. शारदा तायडे, ९७६२४६३१११

**श्री लक्ष्मीनारायण सत्संग मंडळ, सारडा लेन, गंजबाजार**

**श्री जय हनुमान युवा प्रतिष्ठाण,** कराचीवाला नगर, महेश थिएटर जवळ, ९४२३७९२५००, ८१८०००८००५

**श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ (ट्रस्ट) नवीपेठ**

**समझोता तरूण मंडळ,** शिवाजी कदम परिवार, अभिषेक लॉज च्या जवळ, कानडे गल्ली, माळीवाडा

**श्री संकट मोचन हनुमान मंडळ, श्री रामदेवरा दरबार, सारसनगर**

**नरेश नय्यर,** रेसिडेन्शियल फ्रेंडस् ग्रुप, कोर्ट यार्ड कॅम्पस्, तारकपूर बस स्टॅण्ड समोर, ७८७५५५३९३९


# ‘भोंदू बाबा अशोक खरात’ प्रकरणातील पिडीत महिलांचे अश्लील व्हिडिओ व्हायरल प्रकरणी तिघांवर गुन्हा दाखल

नगर – नाशिक येथील भोंदू बाबा अशोक खरात प्रकरणातील पिडीत महिलांचे अश्लील व्हिडिओ सोशल मीडियावर प्रसारित केल्याप्रकरणी कोपरगाव शहर पोलिसांनी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, दोघांना अटक करण्यात आली आहे. तिसरा आरोपी फरार असून त्याचा शोध सुरू आहे.

सरकारवाडा पोलिस ठाण्यात अशोक खरात याच्याविरुद्ध विविध गुन्हे दाखल असून, या प्रकरणाचा तपास विशेष तपास पथकाकडून सुरू आहे. दरम्यान, या गंभीर गुन्ह्यातील पिडीत महिलांचे अश्लील व्हिडिओ सोशल मीडियावर प्रसारित होत असल्याचे समोर आले होते. याप्रकरणी २५ मार्च २०२६ रोजी कोपरगाव येथील ‘बीएमडब्ल्यू’ या व्हॉट्सॲप ग्रुपवर राहुल गंगाधर शिंदे (अनिल कोल्ड्रींग्ज, कोपरगाव) याने त्याच्या मोबाईलवरून अश्लील व्हिडिओ प्रसारित केल्याचे निष्पन्न झाले. पोलिस तपासात हे व्हिडिओ त्याला योगेश पंढरीनाथ आढाव (रा. कोपरगाव) याने पाठविले होते. पुढील तपासात आढाव याला हे व्हिडिओ त्याचा मित्र संदीप गर्जे (रा. माजलगाव, जि. बीड) याने पाठविल्याचे उघड झाले.

त्यावरून राहुल शिंदे, योगेश आढाव व संदिप गर्जे या तिघांविरुद्ध कोपरगाव शहर पोलीस ठाण्यात बीएनएस कलम २९४ (२), ३ (५) तसेच माहिती तंत्रज्ञान कायदा २००० च्या कलम ६७ (अ) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील राहुल शिंदे व योगेश आढाव यांना अटक करण्यात आली असून, संदिप गर्जे हा फरार असून त्याचा शोध सुरू आहे.

सदर प्रकरण अत्यंत संवेदनशील व गंभीर स्वरूपाचे असून अनेक महिला पिडीत असण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळे तपास अत्यंत गोपनीयतेने व पिडीतांची ओळख उघड होणार नाही, याची दक्षता घेत सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले.

दरम्यान, पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, पिडीत महिलेची किंवा तिच्या कुटुंबाची ओळख उघड होईल असे कोणतेही व्हिडिओ, फोटो अथवा अश्लील सामग्री सोशल मीडियावर प्रसारित करू नये. अशा प्रकारची सामग्री आढळल्यास ती तात्काळ हटवावी. अन्यथा संबंधितांवर तसेच ग्रुप ॲडमिनवर गुन्हा दाखल करून कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.



नगर तालुका पोलीस स्टेशनमध्ये नव्याने रुजू झालेल्या सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश वारुळे यांचा स्नेहबंध सोशल फौंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांच्या हस्ते शाल व वृक्ष देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी पोलीस उपनिरीक्षक जयेश गांगुर्डे, माजी प्राचार्य एकनाथ जगताप आदी उपस्थित होते. सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश वारुळे हे अहिल्यानगर येथील रहिवासी असून वारूळवाडी हे त्यांचे मूळ गाव आहे.

# तरुणीचा पाठलाग करून जिवे मारण्याची धमकी

नगर – शहरानजीक असलेल्या बुरुडगाव परिसरातील जाधवमळा भागात एका २२ वर्षीय तरुणीचा पाठलाग करून तिला जिवे मारण्याची धमकी दिल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात ऋषिकेश हृदयनाथ चव्हाण या तरुणाविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ७८ आणि ७९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

संबंधित तरुणी २५ मार्च रोजी सकाळी किराणा सामान आणण्यासाठी जात असताना आरोपी ऋषिकेश चव्हाण याने तिचा पाठलाग केला. ’तू मला फोन का करत नाहीस? जर तू फोन केला नाहीस तर तुला मारून टाकीन,’ अशी धमकी देऊन त्याने तरुणीला घाबरवून सोडले. या प्रकारामुळे भयभीत झालेली तरुणी दुकानात न जाता तशीच घरी परतली.

तरीही आरोपीचा त्रास थांबला नाही. त्याने आपल्या घराच्या गच्चीवर जाऊन पीडितेच्या दिशेने पाहून फोन करण्यासाठी हाताने इशारे केले. इतकेच नव्हे तर, त्याने स्वतःचा मोबाईल क्रमांक लिहिलेली एक चिठ्ठी पीडितेच्या घराच्या दिशेने फेकली. या सततच्या त्रासामुळे अखेर पीडितेने नगर तालुका पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दिली. पोलिसांनी या घटनेची गंभीर दखल घेत तात्काळ गुन्हा नोंदवला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक फौजदार रायचंद पालवे हे करत आहेत.

# तारकपूर परिसरात अपघात; एका जणाचा जागीच मृत्यू



तारकपूर परिसरात झालेल्या अपघातानंतर जिल्हा रुग्णालयात मयताच्या नातेवाईकांची झालेली गर्दी.

नगर – शहरातील तारकपूर परिसरात झुलेलाल मंदिरासमोर डीएसपी चौक ते पत्रकार चौक रस्त्यावर झालेल्या भीषण अपघातात एकाचा जागीच मृत्यू झाल्याची घटना २५ मार्च रोजी रात्री ८ वाजण्याच्या सुमारास घडली. शिवाजी चंदर तोरडे (वय ४६, रा. लालटाकी, अहिल्यानगर) असे मयत व्यक्तीचे नाव आहे.

मयत तोरडे हे त्यांच्या मोपेड वर डीएसपी चौकाकडून पत्रकार चौकाकडे येत असताना तारकपूर बसस्थानका च्या पुढे झुलेलाल मंदिरा समोर एका भरधाव वेगातील वाहनाने त्यांच्या मोपेडला धडक दिली. या धडकेत तोरडे हे गंभीर जखमी झाले. त्यांना नागरिकांनी जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले असता तेथील मेडिकल ऑफिसर डॉ. खेडकर यांनी उपचारापूर्वीच मयत घोषित केले. या अपघाताची माहिती मिळताच मयताच्या नातेवाईकांनी जिल्हा रुग्णालयात मोठी गर्दी केली होती. त्यामुळे काहीकाळ तणाव निर्माण झाला होता.

हा अपघात नसून घातपाताचा प्रकार असल्याच्या चर्चाही सुरु झाल्या होत्या. तोफखाना पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत अपघातास कारणीभूत ठरलेल्या एकास ताब्यात घेतले असल्याचे सांगण्यात आले. या प्रकरणी तोफखाना पोलिसांनी जिल्हा रुग्णालयाचे मेडिकल ऑफिसर डॉ. खेडकर यांच्या अहवालावरून आकस्मात मृत्यूची नोंद केली असून मयताच्या नातेवाईकांच्या फिर्यादी वरून अपघाताचा गुन्हा दाखल करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# सुमन काळे यांच्या मृत्यू प्रकरणी एसआयटी नेमून फेरतपास करावा

## आमदार विक्रमसिंह पाचपुते यांची विधानसभेत लक्षवेधी द्वारे मागणी



नगर – जिल्ह्यातील पारधी समाजातील समाजसेविका सुमन काळे यांचा पोलीस कोठडी झालेल्या मृत्यू प्रकरणाच्या तपासात झालेल्या संशयास्पद दिरंगाईबाबत आमदार विक्रमसिंह पाचपुते यांनी २५ मार्च रोजी विधानसभेत लक्षवेधी मांडून राज्य सरकारचे लक्ष वेधले. पीडितेच्या नातेवाइकांना व पारधी समाजाला न्याय मिळवा म्हणून या प्रकरणात विशेष तपास पथक (एस आय टी) नेमून गुन्ह्याचा फेरतपास करण्याची मागणी आ. पाचपुते यांनी केली. त्यावर राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या परवानगीने एस आय टी संदर्भात निर्णय घेण्याचे आश्वासन दिले आहे.

पारधी समाजाच्या सुमन काळे यांचा १२ मे २००७ रोजी पोलीस कोठडीत झालेल्या मारहाणीत मृत्यू झाला होता. या प्रकरणाचा तपास सीआयडी मार्फत करण्यात आला. मात्र कोणतीच ठोस कारवाई होत नाही. १३ जानेवारी २०२१ रोजी उच्च न्यायालयाने ट्रायल कोर्टाला सहा महिन्यात खटला संपवावा व पीडित कुटुंबाला पाच लाख रुपये भरपाई देण्याचे आदेशही उच्च न्यायालयाने दिले होते. मात्र अद्याप कारवाई झाली नाही.

महाराष्ट्र राज्याचे अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती आयोगाचे उपाध्यक्ष धर्मपाल मेश्राम यांनी ६ फेब्रुवारी रोजी राज्य गुन्हे अन्वेषण विभागाला पत्राद्वारे या गुन्ह्यात अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायदा, १९८९ यातील तरतुदी लागू करून फेरतपास करण्याचे आदेश दिले आहेत. या कामी विवेक विचार मंच या सामाजिक संघटनेने काळे कुटुंबीयांना सहकार्य केले.

या प्रकरणात सीआयडीच्या तपासातील दिरंगाई आणि संशयास्पद भूमिका यामुळे न्याय मिळणेकामी त्वरित एस आय टी नेमून आरोपींविधात ट्रोसिटी कायद्याच्या तरतुदीनुसार कलमात वाढ करून गुन्ह्याचा संपूर्ण फेरतपास करावा अशी, मागणी आ.विक्रम पाचपुते यांनी विधानभवनात केली आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### कडू पण आरोग्यदायी

लोकांना कडू चव आवडत नाही, परंतु ही चव अनेक आरोग्य फायद्यांनी परिपूर्ण आहे. प्राचीन काळापासून आयुर्वेदात कडू पदार्थांमध्ये औषधी गुणधर्म असल्याचे ज्ञात आहे. कडुलिंब एक असे झाड आहे ज्याचा प्रत्येक भाग औषधी गुणधर्मांनी परिपूर्ण आहे. कडुलिंबाची पाने, साल, बिया आणि फळे हे सर्व आरोग्यासाठी फायदेशीर आहेत. कडुनिंबाचा उपयोग त्वचा रोग, दंत समस्या, मधुमेह आणि इतर अनेक आजारांवर केला जातो. कडुनिंबामध्ये अँटीबॅक्टेरियल, अँटीफंगल आणि अँटी-इंफ्लेमेटरी गुणधर्म असतात जे शरीर निरोगी ठेवण्यास मदत करतात. तुम्ही कडुलिंबाच्या पानांचा उष्टा पिऊ शकता किंवा कडुलिंबाचे तेल वापरू शकता. मेथीचे दाणे हे एक लहान बियाणे आहे जे अनेक आरोग्य फायद्यांनी भरलेले आहे. मेथीचे दाणे रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करण्यास, कोलेस्ट्रॉल कमी करण्यास आणि पचन सुधारण्यास मदत करतात. मेथीचे दाणे भाज्या, मसूर किंवा सूपमध्ये वापरता येतात. तुम्ही मेथीच्या दाण्यांची पावडरही बनवून पाण्यात मिसळून प्या. तुळशी ही एक पवित्र वनस्पती आहे जी अनेक आरोग्य लाभांनी भरलेली आहे. तुळशीचा उपयोग सर्दी, खोकला, ताप आणि इतर अनेक आजारांवर केला जातो. तुळशीमध्ये अँटिऑक्सिडेंट, अँटीबॅक्टेरियल आणि अँटी-इंफ्लेमेटरी गुणधर्म असतात जे शरीर निरोगी ठेवण्यास मदत करतात. तुम्ही तुळशीच्या पानांचा डेकोक्शन पिऊ शकता किंवा तुळशीची पाने चघळू शकता.

## पाककला

### मुळ्याची चटणी

**साहित्य :** मुळा - १ कप किसलेले, हिरव्या मिरच्या - १-२, आले - १ छोटा तुकडा, कोथिंबीर - १/२ कप, लसूण पाकळ्या - ४-५, भाजलेले जिरे - १ चमचा, लिंबाचा रस किंवा चिंचेचा कोळ - १ चमचा, मीठ चवीनुसार, दही - १-२ टेबलस्पून

**कृती :** सर्वात आधी मुळा धुवा, सोलून घ्या आणि किसून घ्या. आता जास्त पाणी काढून टाकण्यासाठी किसलेला मुळा हळूवार पिळून घ्या. तसेच हिरव्या मिरच्या, आले, लसूण आणि कोथिंबीर मिक्सरमध्ये टाका आणि बारीक करा. आता किसलेला मुळा, भाजलेले जिरे, मीठ आणि लिंबाचा रस घाला. जास्त बारीक करू नका; मुळ्याचा पोत राखल्याने चव दुप्पट होते. थोडे दही घाला, अधूनमधून ढवळत रहा. ही चटणी आणखी चविष्ट होईल. तर चला तयार आहे मुळा चटणी रेसिपी, गरम पराठे, पुरीसोबत नक्कीच सर्व्ह करा.

## वास्तू

### कापूर आणि दिवा

घरात अग्नी आणि सुगंधाचे संतुलन वास्तुदोषांना शांत करते यासाठी दररोज सकाळी आणि संध्याकाळी कापूर जाळा आणि त्याचा धूर घरात पसरवा. याव्यतिरिक्त, घराच्या ईशान्य कोपऱ्यात तुपाचा दिवा लावल्याने देवदोष आणि वास्तुदोषांचे परिणाम कमी होतात. घराचा ईशान्य कोपरा हा सर्वात पवित्र मानला जातो. जर येथे कोणतेही जड साहित्य किंवा गोंधळ असेल तर त्यामुळे गंभीर वास्तुदोष निर्माण होऊ शकतात.

## सौंदर्य

जावित्रीमध्ये अँटिऑक्सिडंट्स असतात जे फ्री रॅडिकल्सशी लढतात, ज्यामुळे त्वचा चमकदार होते, पिंपल्स कमी होतात आणि वृद्धत्वाची लक्षणे कमी होतात. महिलांमध्ये हार्मोनल असंतुलनामुळे होणाऱ्या त्वचा समस्या दूर होतात.

## सल्ला

लोणचे स्वच्छ आणि कोरड्या काचेच्या भांड्यात भरा. भांडे ३-४ दिवस उन्हात ठेवा जेणेकरून लोणचे चांगले पिकेल.

**संकलक : अ‍ॅड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

शुक्रवार, दि. २७ मार्च २०२६

**---, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, चैत्र शुक्लपक्ष, पुनर्वसू १५।२४, सूर्योदय ०६ वा. २७ मि. सूर्यास्त ०५ वा. ३० मि.**

### राशिभविष्य

**मेष** : अवाजवी खर्च टाळा. नेमके बोला. कामाच्या ठिकाणचे वरिष्ठांचे दडपण वाढवू शकतो.

**वृषभ** : सोयी सवलतींसाठी खर्च वाढेल. हाताखालील व्यक्तींना मदत करावी लागेल. घरातील ताणतणावामुळे तुम्ही चिडचिड कराल.

**मिथुन** : बेकायदा कामे नको. मूलभूत गरजांवर काम करा. भांडण नको. हृदयरोग असणाऱ्यांनी कॉफी सोडण्याची तातडीची गरज आहे.

**कर्क** : कामात एकरूपता हवी. कामाच्या ठिकाणचे वरिष्ठांचे दडपण आणि घरातील कलह तुमच्यावरील तणाव वाढवू शकतो

**सिंह** : परगावी शाखा काढा. नैराश्याच्या जाणीवेला तुमच्यावर हावी होऊन देऊ नका. मुले व पत्नीच्या सहवासामुळे आनंद मिळेल.

**कन्या** : तांत्रिक कामे त्वरित करावीत. खर्च वाढेल. राखीव फंड हाताशी ठेवा. शारिरीक व्याधीपासून मुक्तता होण्याची शक्यता आहे.

**तूळ** : परस्पर वाद टाळा. जुने मित्र-मैत्रिणी भेटतील. उत्तम वैवाहिक सौख्य लाभेल. मागील उधारी वसुल होईल.

**वृश्चिक** : करार वा हमीस चांगला. अंदाज चुकेल. आणखी आशावादी राहण्यासाठी स्वत:ला प्रवृत्त करा.

**धनु** : टोकाची भूमिका नको. भावनिक चुका टाळा. तुमचे आवडते छंद जोपासण्यासाठी किंवा तुमच्या आवडीच्या गोष्टींचा आनंद घ्या.

**मकर** : वेळ पाळावीच लागेल. चर्चा टाळा. तुमच्या विचारांवर ज्यांचा असाधारण प्रभाव आहे

**कुंभ** : भावनिक द्वंद्वे टाळावीत. काही ठिकाणी तुम्हाला जबरदस्त माघार घ्यावी लागू शकेल.

**मीन** : घोळ निस्तरतील. भावनिक आनंद मिळेल. प्रवास टाळा. आपले मानसिक आणि शारीरिक आरोग्य संतुलित राखा. कामे संयमाने करावीत.

## फिल्मीचक्कर क्र. १२२९ सौ. शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | | ३ | | | ४ |
| | ■ | | ■ | | ■ | ■ | |
| ५ | | | ■ | ६ | | | ■ |
| | ■ | ■ | ■ | | ■ | ■ | ७ |
| | ■ | ८ | ■ | ९ | | १० | |
| | ■ | | ■ | | ■ | | ■ |
| ११ | | | १२ | ■ | १३ | | ■ |
| | ■ | १४ | | ■ | १५ | | |

**आडवे शब्द :** १) ++ ++ ++ ++ प्यार के चर्चे हर जबान पर सबको मालूम है और सबको खबर है (गाणे) ५) नूतन, सुनील दत्त यांचा एक गाजलेला चित्रपट ६) कल + ++ किसको पता अभी जिंदगी का ले लो मजा (गाणे) ९) गीत ++ ++ (चित्रपटाचे नाव) ११) राखी गुलजार, अमिताभ बच्चन यांचा एक चित्रपट १३) ++ और पुण्य (चित्रपटाचे नाव) १४) मुन्ने की अम्मा ए तो ++ तेरे बेटे के अब्बा का नाम क्या है (गाणे) १५) स्मिता +++ (दिवंगत अभिनेत्री)

**उभे शब्द :** १) राजेंद्रकुमार, सायराबानो, धर्मेंद्र यांचा एक चित्रपट २) करन +++ (चित्रपटाचे नाव) ३) 'शोले'मधील गब्बरसिंगचा कालियासंदर्भातील प्रसिद्ध डायलॉग - ++ + + + + कालिया ४) 'सावनभादो, खूबसूरत, मिस्टर नटवरलाल' आदी चित्रपटांची नायिका ७) कल आज और ++ (चित्रपटाचे नाव) ८) माया ++++ (चित्रपटाचे नाव) १०) 'भिंगरी' या मराठी चित्रपटावरून हिंदी काढलेला चित्रपट ज्यात स्मिता पाटील आहे १२) ++ मंगेशकर (प्रसिद्ध गायिका) १३) ++ कहते बडा नाम करेगा (गाणे)

# ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

**सुविचार** : एक काळ असा होता जेव्हा लोकं घर राखायला एखादं कुत्रं ठेवायची, आज कालची लोकं कुत्रं राखायला एखादा माणूस ठेवतात.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### महिलांच्या हस्ते नारळ का फोडत नाहीत?

नारळाशिवाय कोणतीही पूजा पूर्ण होत नाही. पूजेत नारळ ठेवणे पवित्र मानले जाते, धार्मिक मान्यतेनुसार नारळाची उत्पत्ती भगवान विष्णूने केली होती, म्हणून त्याला श्रीफळ असेही म्हणतात. नारळात ब्रह्मा, विष्णू आणि महेश हे तीन देव वास करतात असे म्हणतात. या कारणास्तव, प्रत्येक पूजेमध्ये नारळ अनिवार्य असते. पुजेत नारळ ज्याला आपण श्रीफळ देखील म्हणतो ते देवाला अर्पण केले जाते. गृहप्रवेश असो किंवा नवीन कार खरेदी, या सर्व शुभ प्रसंगी नारळ फोडण्याची परंपरा (Nariyal in Puja) आहे, धार्मिक मान्यतेनुसार यामुळे नकारात्मक उर्जा दूर होते. तसेच तुमच्या आनंदाला कोणाची नजर लागत नाही. हवन पूजेच्या वेळी कलशात नारळ ठेवले जाते. हिंदू धर्मात नारळाचा वापर कोणत्याही पूजा किंवा शुभ कार्यात अवश्य केला जातो.

नारळ फोडण्याची ही परंपरा वर्षानुवर्षे अशीच सुरू आहे, मात्र एक गोष्ट तुमच्या ध्यानात आली असेल ती म्हणजे महिला सहसा नारळ फोडत नाही. यामागे नेमके काय कारण आहे याचा तुम्ही कधी विचार केला आहे का? या सर्व गोष्टींमागे वेगवेगळ्या कथा प्रचलीत आहेत, चला कारण जाणून घेऊया. नारळाशिवाय कोणतीही पूजा पूर्ण होत नाही. पूजेत नारळ ठेवणे पवित्र मानले जाते, धार्मिक मान्यतेनुसार नारळाची उत्पत्ती भगवान विष्णूने केली होती, म्हणून त्याला श्रीफळ असेही म्हणतात. नारळात ब्रह्मा, विष्णू आणि महेश हे तीन देव वास करतात असे म्हणतात. या कारणास्तव, प्रत्येक पूजेमध्ये नारळ अनिवार्य असते. पुजेत नारळ ज्याला आपण श्रीफळ देखील म्हणतो ते देवाला अर्पण केले जाते. तसेच ते फोडल्यावर सर्वांमध्ये प्रसाद म्हणून वाटले जाते. आता प्रश्न येतो की महिला नारळ न फोडण्याचे कारण काय? यामागे लोकांच्या वेगवेगळ्या समजुती आहेत. धार्मिक श्रद्धेनुसार, काही लोकांचा असा विश्वास आहे की नारळ हे एक बीज आहे, ज्यापासून जीवन निर्माण होते आणि स्त्रिया देखील जीवनदाता आहेत, म्हणून ते बीज नष्ट करू शकत नाहीत. याशिवाय नारळ फोडण्यासाठी जास्त शक्तीची गरज असते स्त्रियांच्या तुलनेत पुरुषांमध्ये शारिरीक शक्ती जास्त असते, त्यामुळे स्त्रीयांऐवजी पुरूषांना नारळ फोडण्याचे काम सोपवले जाते. या शिवाय दुसरी गोष्ट म्हणजे शुभ प्रसंगी स्त्रीया बांगड्या घालतात. नारळ फोडताना त्या बांगड्या फुटू शकतात, त्यामुळे दुखापत होण्याची शक्यता असते. यासाठी स्त्रीयांनी नारळ न फोडण्याचा सल्ला जुन्याकाळी दिला जात असे. तसे यामागे कुठली अंधश्रद्धा नाही. महिलांनी नारल न फोडण्याचा कुठलाही नियम सांगण्यात आलेला नाही. नारळ फोडण्यासाठी एखादी महिला शारिरीक दृष्ट्या सक्षम असेल तर त्यांनी ते अवश्य फोडावे. तसे, महिलांना कोठेही नारळ फोडण्यास मनाई मात्र नाही.

### आनंद वाटू या

अनेक वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. ससा आज खूप दुःखी होता. गेल्या आठवड्यात त्याने गोळा केलेले गाजर कीटकांमुळे खराब झाले होते. त्याचा मित्र उंदीर सश्याला भेटायला आला.


सश्याने उंदीरला सर्व काही सांगितले. उंदीर त्याला जंगलाबाहेर एका शेतात घेऊन गेला, जिथे सश्याला भरपूर गाजर सापडले. ससा आता आनंदी होता आणि त्याचा आनंद पाहून उंदीर देखील खूप आनंदी होता. ससा उड्या मारत गाजर घेऊन जंगलात परत जात होता तेव्हा त्याला कोणीतरी वेदनेने ओरडताना ऐकू आले. हा आवाज जवळच्या आंब्याच्या झाडाचा येत होता. संशयाने झाडाला त्याच्या वेदनांचे कारण विचारले. झाड म्हणाला, या फळांच्या वजनामुळे माझे खोड वाकत आहे आणि मला खूप वेदना होत आहे.

ससा धावत गेला आणि हत्तीला हाक मारली. हत्तीने झाडावरून अनेक आंबे पाडले.

झाड खूप समाधानी झाले आणि त्याने हत्तीचे आभार मानले. झाडाला आनंदी पाहून ससा आणि हत्ती देखील खूप आनंदी झाले. त्यांनी अर्धे आंबे आपापसात वाटून घेतले. हत्ती, त्याच्या सोंडेत आंबे धरून, आपल्या घराकडे निघाला. वाटेत त्याला काही माकडे दिसली जी अनेक दिवसांपासून उपाशी होती. हत्तीने त्याचे सर्व आंबे त्या माकडांना दिले. माकडांनी मोठ्या आनंदाने आंबे खाल्ले. त्यांना आनंदी आणि समाधानी पाहून हत्ती खूप आनंदी झाला. त्याला यापूर्वी कधीही इतके आनंदी वाटले नव्हते.

तात्पर्य : जेव्हा आपण इतरांना आनंदी करण्याचा प्रयत्न करतो तेव्हा आपला स्वतःचा आनंद देखील वाढतो.

## जीवन का अमृत (भाग १)



१०. इंसान वैसा नहीं होता, जैसा वह प्रतीत होता है। हर एक के साथ उसके पुराने कर्मों का लेखा-जोखा हैं। आपके पुराने कर्म फलीभूत हो रहे हैं और आपको सहायता मिल रहीं है। भूखों के लिए रोटी है और प्यासों के लिए पानी है। पुराने जन्मों के कर्मों का फल अब मिल रहा है और अभी तक आप जिन परिस्थितियों से गुजर चुके हैं, वे इन सबका ही नतीजा हैं।

११. जैसा कि आपने 'इंसान! अपने आपको जान' में कर्मों के बारे में संक्षिप्त में पढ़ा, प्रालब्ध कर्मों को नहीं छेड़ा जाता और इंसान को अवश्य ही अपने जीवन में उन्हें भुगतना होता है ।

पर उनकी तीव्रता और अवधि कम कर दी जाती है। यदि नामदान के समय प्रालब्ध कर्मों को समाप्त कर दिया जाए, तो नामलेवा को लेना या देना नही होगा और इसलिए उसके संसार में रहने का कोई कारण कुछ भी नहीं बचेगा। दो अन्य प्रकार के कर्मों को उसी प्रकार से खत्म कर दिया जाता है, जैसा कि इसमें समझाया गया है। यही प्रभु का विधान है

### प्रभू का विधान

१२. यह सच है कि प्रकृति के नियम बहुत कठोर हैं और उनको तोड़ने का दंड अवश्य भुगतना होता हैं, हालाँकि महान सत्गुरु के चरणों में, उनकी तीव्रता काफी हद तक कम हो जाती है। हर एक को अपना बर्तन साफ करना होगा, इससे पहले कि इसे सत्गुरु की दया-मेहर से भरा जा सके कोई भी लाभ अप्रत्याशित नहीं होता, परन्तु सत्गुरु के घर में की गई मेहनत अधिक फल लाती हैं।

१३. आपकी सत्य की लंबी खोज आपको जिंदा सत्गुरु तक ले आई । यह किसी दुर्लभ अच्छे कर्म का फल होता है कि हममें आध्यात्मिक जागृति के लिए तड़प पैदा होती हैं और प्रभु के अपने अनूठे तरीके होते हैं, सच्चे जिज्ञासुओं को सही जगह तक पहुँचाने के १

१४. जहाँ तक दूसरों के पापों के लिए स्वयं के बलिदान आदि का प्रश्न हैं, कृपया 'इंसान ! अपने आपको जान' पुस्तिका में कर्म के अध्याय को पढ़ें। ईसा मसीह (जीसस) अपने समय के अनजान लोगों को जागृत करने के लिए आए थे, पर लोंगों ने उन पर या उनकी उच्चतर जीवन की शिक्षाओं पर विश्वास नहीं किया। ईसामसीह ने उन पर दया की और बहुत से लोग, जो उनसे मिले. उनके कर्मों को

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

ओर जाते हैं, तो कोई बात नहीं, पर यह इंसान को शोभा नहीं देता, जो कि सृष्टि में सर्वश्रेष्ठ है, कि वह निम्न प्रवतियों के साथ पागलों की तरह चिपका रहे । इंद्रिय सुखों में लगे रहना सबसे बड़ा पाप हैं, जो अपने साथ हर प्रकार की दुख तकलीफ और उदासी लाता है। सृष्टि का चक्र क्रमबद्ध काम करता है और अपने आप चलता जाता है । निम्नतर जीव नए कर्म पैदा नहीं करते, बल्कि पुराने कर्मों का फल भोगते हैं। हालाँकि कुत्तों और घोड़ों में कुछ बुद्धि होती हैं, पर वे महान नियम के तहत बँधे होते हैं और अपनी पुरानी कमाई के हिसाब से दुख उठाते हैं। कर्म और पुर्नजन्म, निकट से संबंधित हैं। यह प्रश्न खुद इतना जटिल है कि बुद्धिजीवियों ने, जिन्हें परलोक का कोई ज्ञान नहीं हैं, अपनी सीमित बुद्धि से इस विषय पर तर्क-वितर्क करने की कोशिश की है। जिस प्रकार आध्यात्मिक ज्ञान इंद्रियों के स्तर पर प्राप्त नहीं हो सकता, उसी प्रकार यह कर्मों का विधान तब तक पूरी तरह नहीं समझा जा सकता, जब तक हम इंद्रियों के घाट पर जी रहे हैं या जब तक कि हम कारण मंडल तक चढ़ाई नहीं कर लेते। यह इंसान की सोच-समझ से परे की बात है कि ९. पुराने कर्मों की वजह से, जिन पर यह भौतिक जिदंगी निर्भर करती हैं जो भी प्रतिकूल परिस्थितियाँ आ जाती हैं, वे बालक शिष्य को, उसकी रूहानी तरक्की के लिए, ऊपर उठाने का काम करती हैं। यह उसकी दुर्लभ दिव्य दया है कि आपको सही समझ का आशीर्वाद मिला है और आप हर वस्तु को सही दृष्टिकोण से देख पाते हैं ।

### नाते म्हणजे दोन आत्म्यांतील संपर्क

आपल्या नात्यांवर होतो. आत्मा कमकुवत झाल्यामुळे आणि नकारात्मक ऊर्जेच्या देवाणघेवाणी मुळे नात्यांमध्ये बेबनाव वाढत चालला आहे. हे सगळं आपल्यासाठी योग्य आहे का हे आज आपण स्वतःलाच विचारायला हवं. सुरेश ओबेरॉय : हे आपण ध्यानाद्वारे करू शकतो का? शिवानीदीदी : नक्कीच. ध्यान आणि चिंतन - मला स्वतःला पाहायचं आहे... प्रत्येक प्रसंगात परिस्थिती ही बाह्य निर्मिती आहे... पण मी जी प्रतिक्रिया देईन ती माझी निवड आहे... माझी स्वत:ची स्थिती ही माझी निवड आणि निर्मिती आहे... मी एक शक्तिशाली आत्मा आहे याची मी आजपासून जाणीव ठेवेन... कोणतीही व्यक्ती किंवा मनःस्थिती माझी मन:शांती हिरावून घेऊ शकत नाही... मी एक शक्तिशाली अस्तित्व आहे... आजपासून मी स्वतःकडे लक्ष देईन... मी स्वत:ला वाहतुकीच्या कोंडीत, कामाच्या ठिकाणी आणि कुटुंबासोबत पाहीन... काही वेळा मनाविरुद्ध परिस्थिती निर्माण होईल पण तरीही मी स्थिर राहीन... मला कोणीही अस्थिर करू शकत नाही... शांती, प्रेम आणि आनंद हे माझे विशेष गुण आहेत... परिस्थिती कोणतीही असली तरीही मी प्रत्येक प्रसंगात या तीन घटकांचाच वापर करेन... ओम शांती! (क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

बंता : सर्वात मोठे आव्हान काय आहे?
बंताचा मुलगा : परीक्षेचा पेपर रिकामा ठेवा आणि शेवटी लिहा...
...जर तुमच्यात हिंमत असेल तर पास व्हा!

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

✻ ग्रीन प्लॅटीनम रेटींग प्राप्त करणारे देशातील पहिले रेल्वेस्थानक कोणते?
– सिकंदराबाद

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद - आरोग्य संवर्धन

यातील तंतुमय पदार्थ, सेंद्रिय आम्ल व नैसर्गिक शर्करा हे गुणधर्म असलेल्या जिऱ्यामुळे पोट साफ होण्यास मदत होते.

आयुर्वेदानुसार द्राक्षे ही मृदू विरेचक असल्याने मलावरोध, बद्धकोष्ठता हे विकार दूर होतात.

२) द्राक्षे आणि खडीसाखर एकत्र करून खाल्ल्याने शरीरात होणारा दाह कमी होतो.

३) शरीरामध्ये ग्लुकोजचे प्रमाण कमी झाल्यामुळे जर डोकेदुखीचा त्रास होत असेल, तर द्राक्षे खाल्ल्याने डोकेदुखीचा त्रास लगेचच कमी होतो.

४) स्त्रियांच्या आरोग्यासाठी व लहान मुलांच्या वाढीसाठी द्राक्ष हे फळ उत्तम आहे. कारण यामध्ये लोह, कॅल्शिअम व ग्लुकोज हे शरीरसंवर्धन व रक्तवाढीसाठी उपयुक्त असणारे घटक भरपूर प्रमाणात आहेत.

### द्राक्षे

५) हिरड्यांमधून जर रक्त येत असेल व दात हिरड्यांपासून सैल होऊन हलत असतील, तर अशावेळी रोज द्राक्षरस व आवळा चूर्ण एकत्र करून हा रस तोंडात काही वेळ धरून ठेवला, तर हिरड्यांमधून रक्त येणे बंद होते व दात पक्के होतात.

६) किसमिस, सुंठ, मिरी, पिंपळी, आवळा, जेष्ठमध हे सर्व चूर्ण एकत्र करून त्यात थोडा मध घालून दिवसातून तीन वेळा हे मिश्रण चाटण करावे. यामुळे कोरडा खोकला बरा होतो.

७) काळे मनुके व जेष्ठमध रात्री भिजत घालावे. सकाळी ते पाणी उकळून प्यायल्याने शरीराचा दाह कमी होतो व तृष्णा रोग बरा होतो.

८) द्राक्षे, खडीसाखर, मध व पिंपळी एकत्र घेतल्याने धातुक्षय कमी होऊन अशक्तपणा दूर ९) द्राक्षे, काळे मनुके व धणे रात्री थंड पाण्यात भिजत घालून सकाळी प्यायल्याने अर्धशिशी कमी होते.

१०) आम्लपित्त, अपचन, ढेकर येणे या पित्तविकारांवर द्राक्षे खाल्ली असता पित्तप्रकोप कमी होऊन आराम मिळतो. द्राक्षामध्ये पाण्याचे प्रमाण अधिक आहे. तसेच पोटॅशिअम क्षारही आहेत.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००



हिंद सेवा मंडळाच्या कार्याध्यक्षपदी सुमतीलाल कोठारी यांची बिनविरोध निवड झाल्यावर त्यांचा सत्कार करताना संस्थेचे अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक व सचिव संजय जोशी. समवेत डॉ.रमेश झरकर, ॲड. अनंत फडणीस, ब्रिजलाल सारडा, डॉ.पारस कोठारी व संचालक.

# हिंद सेवा मंडळाच्या कार्याध्यक्षपदी सुमतीलाल कोठारी बिनविरोध

नगर – नगर जिल्ह्यातील शैक्षणिक क्षेत्रातील संस्था असलेल्या हिंद सेवा मंडळाच्या कार्याध्यक्षपदी ज्येष्ठ संचालक सुमतीलाल कोठारी यांची बिनविरोध निवड झाली. संस्थेचे अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत ही निवड झाली. या निवडीनंतर कोठारी यांचा प्रा.मोडक, मानद सचिव संजय जोशी व मावळते कार्याध्यक्ष डॉ.रमेश झरकर यांनी सत्कार केला.

यावेळी माजी कार्याध्यक्ष ॲड. अनंत फडणीस, ज्येष्ठ मार्गदर्शक अजित बोरा व ब्रिजलाल सारडा, संचालक अशोक उपाध्ये, अनंत देसाई, प्रा.ज्योती कुलकर्णी, जगदीश झालानी, डॉ.पारस कोठारी, रणजीत श्रीगोड, दिलीप शहा, मधुसूदन सारडा, विष्णू सारडा, शिक्षक प्रतिनिधी प्रा.गिरीश पाखरे, कल्याण लकडे, विठ्ठल उरमुडे, आदिनाथ जोशी आदी उपस्थित होते.

यावेळी प्रा.शिरीष मोडक म्हणाले, मावळते अध्यक्ष डॉ.रमेश झरकर यांनी नव्वदीतही उत्साहात काम करून संस्थाच्या प्रगतीसाठी बहुमोल योगदान दिले आहे. सुमतीलाल कोठारी हे अनुभवी आहेत. राजकीय, सामाजिक अशा सर्वच क्षेत्रात त्यांचे प्रभावी काम असल्याने त्यांचीही कारकीर्द यशस्वी होईल.

सचिव संजय जोशी म्हणाले, हिंद सेवा मंडळाचे सर्व संचालक सर्वसामन्य वियार्थ्यांना सर्वोत्तम ज्ञानदान देण्यासाठी प्रयत्नशील आहेत. सुमतीलाल कोठारी हे अनुभव संपन्न असल्याने तेही ही परंपरा पुढे नेत संस्थेला प्रगतीपथावर नेतील.

डॉ.रमेश झरकर म्हणाले, मागच्या वर्षी कार्याध्यक्ष पदाची जबाबदारी माझ्यावर टाकली होती. सर्व संचालक व पदाधिकाऱ्यांनी भरपूर सहकार्य केल्याने मी ही जबाबदारी पेलू शकलो, अशा शब्दात सर्वांचे आभार मानले.

सुमतीलाल कोठारी म्हणाले, सध्याच्या एआय टेक्नॉलॉजीच्या काळात हिंद सेवा मंडळाच्या सर्व शैक्षणिक संस्थांना पुढे न्यायचे आहे. या स्पर्धेच्या काळात मराठी शाळा मागे पडू नयेत यासाठी सर्व अद्ययावत भौतीक सुविधा देण्यावर माझा भर राहील.

या बैठकीत संस्थेच्या उपकार्याध्यक्षपदी जगदीश झालानी व प्रा. ज्योती कुलकर्णी यांची तसेच सहसचिवपदी अनंत देसाई, अशोक उपाध्ये, मधुसूदन सारडा, ॲड.अनंत फडवीस, रणजीत श्रीगोड, विष्णू सारडा यांची एकमताने निवड करण्यात आली. तसेच संस्थेच्या सहाय्यक सचिवपदी योगेश देशमुख यांचीही निवड झाली. या सर्वांचा सत्कार करण्यात आले. यावेळी कैलास बालटे व कर्मचारी उपस्थित होते.

# प्रेरणादायी अक्षरधन

## ज्ञानदेव आणि शंकराचार्य

सश्रद्ध भक्त, रसाळ आणि प्रज्ञावंत कवी, लोकमनाचा वेध घेणारा प्रबोधनकार अशा विविध भूमिकांपासून ते थेट सखोल तत्त्वचिंतक आणि साक्षेपी तत्त्वविवेचकांपर्यंत ज्ञानदेवांच्या व्यक्तिमत्वाकडे पाहावे लागेल. संत मांदियाळीत ज्ञानदेवांचे स्थान जेवढे मोठे आहे तेवढेच मोठे स्थान सारस्वतांमध्येही आहे कारण सारस्वताचे विश्व त्यांच्या चिंतनाने उजळून निघाले आहे. ज्ञानदेवांच्या वाङ्मयाकडे पाहण्याचे अनेकविध दृष्टिकोन आहेत.

"मुसाफिर" संकलन: दिशान फिचर्स

समाज मनाला सुखावणारी चैतन्य पालवी डॉ. रामचंद्र देखणे 'चपराक' प्रकाशित ललित चिंतन

कोणी त्यांच्या तत्त्वज्ञानाचे विवेचन करील, कोणी त्यांच्या रसाळ आणि भावपूर्ण शब्दसंपत्तीने भारावून त्यांच्या वाङ्मयाचे रसग्रहण करील तर कोणी ज्ञानदेवांनी निर्माण केलेली क्रांतीची बीजे स्पष्ट करून डोळसपणे त्यांनी मांडलेले पुरोगामित्व सांगण्याचा प्रयत्न करील.

गुरुवर्य मामासाहेब दांडेकरांनी ज्ञानेश्वरीच्या प्रस्तावनेत लिहिले आहे की 'ज्ञानदेव हे जसे वरदी अधिकाराने आत्मानुभवी संत होते त्याप्रमाणे ते थोर दर्जाचे तत्त्वज्ञही होते. कित्येकांची अशी कल्पना आहे की आत्मानुभवी संत हा आत्मरस सेवनात गुंग होऊन राहातो आणि तत्त्वज्ञान हा एक बुद्धिचा खेळ आहे असे समजून त्याच्याकडे दुर्लक्ष करतो परंतु आत्मानुभवी आणि तत्त्वचिंतक असा योग क्वचितच सापडतो. याची आपल्या भारतातील दोन महत्त्वाची उदाहरणे म्हणजे शंकराचार्य आणि ज्ञानेश्वर माउली. आचार्यांनी, 'ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या' असे जे प्रतिपादन केले त्याचा नीट अर्थ न लावल्याने त्यातील मूळ अर्थ लोपला गेला. आचार्य म्हणतात विश्वात सुंदरताही आहे पण मायेच्या प्रभावाने ती झाकोळून जाते. त्या दृष्टीने जे विनाशी आणि संपणारे आहे ते मिथ्याच होय. ही सुंदरता जर ब्रह्मतत्त्वाने जोडली तर अविनाशी ठरते. अविनाशी तत्त्व हे सत्यच आहे. आचार्यांचा हा मायावाद मूळ ईश तत्त्वापासून किंवा चैतन्यरूपापासून दुरावलेल्या विश्वाला म्हणजे चैतन्यरहित विश्वाला मिथ्यत्व मानणारा आहे. विश्व, त्यातील चैतन्य आणि परमात्मस्वरूप याची अनुभूती सांगताना ज्ञानदेव चिद्विलास तत्त्व मांडतात.

'सर्वं खल्विदं ब्रह्म' या सिद्धांताचा अर्थ समजावून सांगताना शंकराचार्य मायावादाची भाषा वापरतात तर ज्ञानदेव चिद् विलासाची. मायावाद हे अंतिम सत्य नव्हे तर मायावाद ही अद्वैत समजून घेण्याची रीत आहे. ज्ञानदेव विश्वाकडे परमात्म्याचे आनंद भुवन म्हणून पाहातात. शंकराचार्य जेव्हा ब्राह्मी स्थितीतून जगाकडे पाहतात तेव्हा तेही चिद्विलासाशिवाय दुसरी भाषा वापरत नाहीत. शंकराचार्य हे केवलाद्वैती असल्याने एकातून अनेकत्व पाहतात तर ज्ञानदेव त्या अनेकत्वाला पुन्हा एकत्वात सामावून 'विश्व ब्रह्मचि केले' ही अनुभूती घेतात.

– किशोर गांधी

# 'फिनव्हेस्टवाला फायनान्शियल सर्व्हिसेस'चे उद्घाटन





फिनव्हेस्टवाला फायनान्शियल सर्व्हिसेस'चा उद्घाटन समारंभ लालटाकी रोडवरील सर्जेपुरा 'व्हाइट हाऊस' येथे पार पडला.

नगर – 'फिनव्हेस्टवाला फायनान्शियल सर्व्हिसेस'चा उद्घाटन समारंभ २२ मार्चला लालटाकी रोड, सर्जेपुरा 'व्हाइट हाऊस' येथे पार पडला. फिनव्हेस्टवालाचे संचालक अनिलकुमार रायचंद कटारिया आणि घनश्यामलाल मोहनलाल दरक यांनी पाहुण्यांचे स्वागत केले.

फिनव्हेस्टवाला ही एक आर्थिक सेवा पुरवणारी कंपनी असून, ती इक्विटी म्युच्युअल फंड, रोखे (Bonds), इक्विटी सल्लासेवा, विमा आणि कर्ज यांसारख्या सर्व आर्थिक सेवा एकाच छताखाली उपलब्ध करून देते. सुरुवातीच्या टप्प्यात, कंपनीने अहिल्यानगर, पुणे आणि नाशिक या तीन शहरांमध्ये आपल्या शाखा सुरू केल्या आहेत.

उद्घाटनपर भाषणात, सीए पवनकुमार दरक यांनी आर्थिक नियोजनाचे महत्त्व आणि कोणत्याही ब्रोकरेज किंवा कमिशनशिवाय गुंतवणूक करण्याच्या पद्धतींबद्दल सविस्तर माहिती दिली. कंपनीच्या संचालकांना वित्त आणि गुंतवणूक क्षेत्रात २५ वर्षांहून अधिक कामाचा अनुभव आहे.

या कार्यक्रमादरम्यान, कंपनीचे इतर संचालक अजयकुमार कटारिया, अमोलकुमार कटारिया, नितेश रुणवाल आणि सीए रुचा संकलेचा (रुणवाल) हे देखील उपस्थित होते. यावेळी विविध व्यापारी, उद्योजक, नोकरदार वर्ग, चार्टर्ड अकाउंटंट्स इत्यादींनी उपस्थिती लावली.

याप्रसंगी त्यांनी अहिल्यानगरमधील व्यापारी आणि गुंतवणूकदारांच्या हितासाठी 'बिझनेस नेटवर्किंग' आणि 'वेल्थ क्लब' सुरू करण्याची घोषणाही केली. कंपनीच्या संचालकांनी असे जाहीर केले की, ज्यांना या समूहांमध्ये सहभागी व्हायचे आहे, त्यांनी अहिल्यानगर येथील 'व्हाइट हाऊस' स्थित नोंदणीकृत कार्यालयाशी संपर्क साधावा. अहिल्यानगर सीए इन्स्टिट्यूट शाखेचे अध्यक्ष सीए अभयकुमार कटारिया यांनी कंपनीला आपल्या शुभेच्छा दिल्या.

# अरिहंत कॉलेज ऑफ फार्मसी, नगरचा उन्नती फौंडेशन सोबत सामंजस्य करार




अरिहंत कॉलेज ऑफ फार्मसी व उन्नती फौंडेशन यांच्यातील सामंजस्य करार

नगर – विद्यार्थ्यांच्या रोजगारक्षमतेत वाढ करण्याच्या उद्देशाने अरिहंत कॉलेज ऑफ फार्मसी, अहिल्यानगर यांनी उन्नती फौंडेशन सोबत सामंजस्य करार (MoU) केला आहे. या कराराअंतर्गत महाविद्यालयात UNXT Employability Training Program राबविण्यात येणार आहे. हा करार महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. योगेश बाफना, उन्नती फौंडेशनचे संचालक रमेश स्वामी तसेच प्रतिनिधी सौ. जयश्री त्रिभूवन यांच्या उपस्थितीत पार पडला.

या प्रशिक्षण कार्यक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना स्पोकन इंग्लिश, प्रभावी संवाद कौशल्य, व्यक्तिमत्त्व विकास, आत्मविश्वास वाढ, जीवन कौशल्ये, सार्वजनिक वक्तृत्व, गटचर्चा (Debate) व मॉक इंटरव्ह्यू यांचे मार्गदर्शन दिले जाणार आहे. सुमारे ३५ ते ४० दिवसांचा कालावधी असलेल्या या कार्यक्रमात दररोज ३ तासांचे प्रशिक्षण दिले जाईल. या उपक्रमाची वैशिष्ट्ये म्हणजे तज्ज्ञांचे मार्गदर्शन, ॲक्टिव्हिटी–आधारित शिक्षण, प्रात्यक्षिक ज्ञानावर भर आणि कोणतीही परीक्षा नसणे ही आहेत. विशेष म्हणजे हा प्रशिक्षण कार्यक्रम पूर्णपणे मोफत असून महाविद्यालयाच्या कॅम्पसमध्येच आयोजित करण्यात येणार आहे.

यावेळी प्राचार्य डॉ. योगेश बाफना यांनी सांगितले की, या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढून ते उद्योगक्षेत्रासाठी सज्ज होतील. तर रमेश स्वामी यांनी कौशल्याधारित शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच जयश्री त्रिभूवन यांनी विद्यार्थ्यांसाठी हा उपक्रम अत्यंत उपयुक्त ठरेल असे सांगितले.

या सामंजस्य करारामुळे विद्यार्थ्यांच्या करिअर घडविण्यास नवी दिशा मिळणार असून त्यांच्या प्लेसमेंटच्या संधींमध्येही मोठी वाढ होणार आहे.

# अहिल्यानगर सीए विद्यार्थी विकासा शाखेचा पदग्रहण सोहळा



अहिल्यानगर सीए विकासा शाखेच्या पदाधिकाऱ्यांचा पदग्रहण समारोह सीए शाखेच्या पश्चिम विभाग (WIRC WICASA) चे अध्यक्ष सीए राजेश अगरवाल यांच्या हस्ते करण्यात आले.

नगर – अहिल्यानगर सीए विकासा शाखेच्या पदाधिकाऱ्यांचा पदग्रहण समारोह २२ मार्च रोजी सीए शाखेच्या पश्चिम विभाग (WIRC WICASA) चे अध्यक्ष सीए राजेश अगरवाल यांच्या हस्ते करण्यात आले.

पदग्रहण समारोहात बोलताना सीए राजेश अगरवाल यांनी समारंभात आपल्या प्रेरणादायी भाषणातून विद्यार्थ्यांना करिअर, शिस्त आणि सातत्य यांचे महत्त्व पटवून दिले. तसेच, चार्टर्ड अकाउंटन्सी हे केवळ व्यावसायिक शिक्षण नसून ते एक जबाबदारीचे क्षेत्र आहे. प्रामाणिकपणा, मेहनत आणि वेळेचे व्यवस्थापन हे यशाचे मुख्य घटक आहेत. त्यांनी विद्यार्थ्यांना अभ्यासासोबतच व्यावहारिक ज्ञान मिळवण्याचा सल्ला दिला.

सीए विकासा शाखेच्या वर्ष २०२६–२०२७ पदाधिकारी म्हणून अध्यक्ष सीए महेश तिवारी, कार्यकारी सदस्य सीए सुनंदा रच्चा, उपाध्यक्ष मोक्षी बोरा, सचिव हर्षल फिरोदीया, खजिनदार सिद्धी गुगळे, सहसचिव जितेश खुराणा, सहखजिनदार ईशा कटारिया, कार्यकारिणी सदस्य साक्षी साठे यांनी पदभार स्विकारला.

आपल्या अध्यक्षीय भाषणात सीए महेश तिवारी यांनी पुढील वर्षात घेण्यात येणारे सर्व कार्याक्रमचा आढावा सादर करून २६–२७ या वर्षाची थीम NISHCHAY (निश्चय) चे उपस्थितांच्या हस्ते अनावरण करण्यात आले. येणाऱ्या वर्षात शाखेने विद्यार्थी आणि समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी विविध कार्यक्रमांचे नियोजन केले आहे. यामध्ये विद्यार्थ्यांचे राष्ट्रीय संमेलन, शैक्षणिक सहल, औद्योगिक सहल, युवा महोत्सव आणि क्रीडा महोत्सवाचा समावेश आहे असे संगितले.

यावेळी सीए फाऊंडेशन आणि इंटर पास झालेल्या विद्यार्थ्यांचे सत्कार करण्यात आले. पदग्रहण समारोह निमित मुलांना प्रेरणा म्हणून सीए कुलकर्णी ज्ञानेश यांनी मार्गदर्शन केले. तसेच यावेळी विकासा अहिल्यानगर शाखेचे माजी अध्यक्ष देखील उपस्थित होते.

कार्यक्रमास सीए शाखेचे अध्यक्ष सीए अभयकुमार कटारिया, सचिव सीए महेश भळगट, सदस्य काजल चंदे व माजी अध्यक्ष प्रसाद पुराणिक तसेच सीए मोहन बरमेचा, सीए प्रसाद भंडारी, सीए कुलकर्णी ज्ञानेश, सीए (डॉ.) परेश बोरा, सीए संदीप देसरडा, सीए ज्ञानेश्वर काळे, सनित मुथा, रोहित बोरा ई. उपस्थित होते. कार्यक्रमाला अहमदनगरमधील सीए विद्यार्थी उपस्थित होते.

# महावीर इंटरनॅशनल अहिल्यानगर केंद्राच्या नूतन सभामंडपाचे २९ मार्च रोजी लोकार्पण

नगर – महावीर इंटरनॅशनल अहिल्यानगर केंद्राच्या सामाजिक उपक्रमांसाठी उभारण्यात आलेल्या नूतन सभामंडपाचे लोकार्पण आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते २९ मार्च रोजी सकाळी १०:३० वाजता होणार आहे. आचार्य आनंदऋषी हॉस्पिटलच्या मागे माणिकनगर येथे आ. संग्राम जगताप यांच्या स्थानिक विकास निधीतून हा सभामंडप उभारण्यात आला आहे. या कार्यक्रमात महावीर इंटरनॅशनलच्या अहिल्यानगर केंद्राच्या नूतन पदाधिकाऱ्यांचा पदग्रहण समारंभही होणार आहे, अशी माहिती महावीर इंटरनॅशनलचे अध्यक्ष राजेंद्र बोथरा यांनी दिली.

अधिक माहिती देताना सेक्रेटरी वसंत बोरा म्हणाले, नूतन सभा मंडपाच्या लोकार्पण सोहळ्यास उद्योगपती संपतलाल बाफना, बडीसाजन ओसवाल श्री संघाचे अध्यक्ष प्रेमराज बोथरा, महापौर ज्योती गाडे, उपमहापौर धनंजय जाधव, माजी उपमहापौर गणेश भोसले, नगरसेवक प्रकाश भागानगरे, नगरसेविका मीना चोपडा, अनिता शेटिया, सुनिता फुलसौंदर, विकास जगताप, महावीर इंटरनॅशनलचे सभागीय अध्यक्ष विकास पाटणी, सहभागीय सेक्रेटरी तेजस कमानी, गव्हर्निंग कौन्सिल सदस्य धनराज संचेती व गव्हर्निंग कौन्सिल सदस्य मनोज शेटीया आदी उपस्थित राहणार आहेत.

या लोकार्पण सोहळ्यास उपस्थित राहावे, असे आवाहन महावीर इंटरनॅशनल अहिल्यानगर वीरा केंद्राच्या अध्यक्षा वर्षा बाफना, खजिनदार गौतम पारख, वीरा सेक्रेटरी अर्पणा बोथरा व उल्का पारख आदींनी केला आहे.

# प्रसाद शिंदे यांना महाराष्ट्र भूषण आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर



नगर – समता प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने दिला जाणारा महाराष्ट्र आदर्श शिक्षक पुरस्कार शिक्षकनेते तथा रायझिंग ट्रायबस फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रसाद शिंदे यांना जाहीर झाला असून पुरस्कार वितरण सोहळा ५ एप्रिल रोजी संगमनेर येथे पदवीधर आमदार सत्यजीत तांबे यांच्या हस्ते पुरस्कार वितरण सोहळा पार पडणार आहे, असे समता प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष विजय साळवे यांनी सांगितले. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी आदर्श माता द्वारकाबाई साळवे महाराष्ट्र भूषण आदर्श पुरस्कार सोहळा आयोजित केला आहे.

## हॉटेल समोरून मोटारसायकलची चोरी

नगर – नगर ते छत्रपती संभाजीनगर महामार्गावर जेऊर गावच्या शिवारात असलेल्या स्वागत हॉटेल समोर लावलेली बजाज कंपनीची डिस्कव्हर मोटारसायकल (क्रं.एम.एच.१६ बीए ८६१०) अज्ञात चोरट्याने २२ मार्च रोजी सकाळी ११ ते सायंकाळी १०.३० या कालावधीत चोरून नेली आहे.

याबाबत शरद माणिक मगर (रा.जेऊर, ता.नगर) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून पोलिसांनी अज्ञात चोरट्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.



न्यू आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज मधील रसायनशास्त्र विभाग आणि जनकल्याण रक्तपेढी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रक्तदान शिबीराचे उद्घाटन करताना प्राचार्य बाळासाहेब सागडे.शेजारील छायाचित्रात रक्तदान करताना रक्तदाते दिसत आहेत.

# रक्तदान हे मानवी जीवनातील सर्वश्रेष्ठ कर्तव्य

## प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे यांचे प्रतिपादन, न्यू आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेजमध्ये रक्तदान व थॅलेसेमिया तपासणी शिबिरास प्रतिसाद

नगर – रक्तदान हे मानवी जीवनातील सर्वश्रेष्ठ असे कर्तव्य असून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा या रक्तदान शिबीरामधील सहभाग समाजाला दिशादर्शक ठरणारा असल्याचे प्रतिपादन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे यांनी केले. त्यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतात विद्यार्थ्यांना रक्तदानाचे महत्व व थॅलेसिमिया आजाराबाबत मार्गदर्शन केले.

न्यू आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज मधील रसायनशास्त्र विभाग आणि जनकल्याण रक्तपेढी, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यामाने रक्तदान शिबीर व थॅलेसिमिया तपासणी शिबीर पार पडले. महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभागातील तसेच इतर विद्याशाखेतील पदवी, पदव्युत्तर वर्गातील विद्यार्थ्यांनी तसेच महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर सेवकांनी रक्तदान शिबीरामध्ये सहभाग नोंदविला.

शिबीराचे उद्घाटन प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे यांच्या हस्ते पार पडले. यावेळी विज्ञान शाखेचे उपप्राचार्य प्रा. डॉ. अनिल आठरे, वाणिज्य शाखेचे उपप्राचार्य प्रा. डॉ. संजय कळमकर, प्रबंधक बबनराव साबळे, रसायनशास्त्र विभागाच्या विभागप्रमुख प्रा. श्रीमती सुषमा दरे, जनकल्याण रक्तपेढीचे डॉ. वसंत झेंडे, थॅलेसिमिया आजाराबाबत समाजामध्ये जनजागृती मोहिम राबविणारे डॉ. गौरव पठाडे, डॉ. ॲड. अंजली केवळ यांची प्रमुख उपस्थितीत लाभली.

यावेळी रक्तदान शिबीर कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना रसायनशास्त्र विभागाच्या विभागप्रमुख प्रा. श्रीमती सुषमा दरे यांनी महाविद्यालयात उच्च शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक मुल्य रुजली जावीत या हेतूने अशा समाज उपयोगी उपक्रमांचे आयोजन विभागामार्फत नेहमीच करण्यात येत असल्याचे सांगितले.

प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतात विद्यार्थ्यांना रक्तदानाचे महत्व व थॅलेसिमिया आजाराबाबत मार्गदर्शन केले. रक्तदान हे मानवी जीवनातील सर्वश्रेष्ठ असे कर्तव्य असून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा या रक्तदान शिबीरामधील सहभाग समाजाला दिशादर्शक ठरणारा असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले.

शिबीरास अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे, उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर, सचिव ॲड. विश्वासराव आठरे पाटील, सहसचिव इंजि. मुकेश मुळे, खजिनदार ॲड. दिपलक्ष्मी म्हसे तसेच संस्थेचे विश्वस्त, कार्यकारणी सदस्य यांचे मार्गदर्शन लाभले.

शिबीर यशस्वीरित्या पार पाडण्याकरिता रसायनशास्त्र विभागातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर सेवकांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन रक्तदान शिबीराचे समन्वयक प्रा. अविनाश करंडे यांनी केले.



## कर्णबधिर मित्रांसोबत विशेष उपक्रमाने ईद मिलन कार्यक्रम साजरा

संगमनेर येथे ईदच्या प्रसंगी कर्णबधिर मित्र मंडळींसाठी मोहसीन पठाण यांच्यातर्फे मसाला दूध आणि जेवण वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या उपक्रमाला कर्णबधिर बांधवांचा प्रतिसाद लाभला. या कार्यक्रमास साई डेफ फाउंडेशन संस्थेचे अध्यक्ष अजय गांधी यांनी उपस्थित राहून कर्णबधिर मुलांसोबत ईद साजरी केली. त्यांच्या उपस्थितीत मुलांना मसाला दूध आणि जेवण वाटप करण्यात आले. या कार्यक्रमात सुमारे ६० कर्णबधिर मुले उपस्थित होती. अशा सामाजिक उपक्रमांमुळे कर्णबधिर समाजामध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, सर्वांनी या उपक्रमाचे कौतुक केले.



दसरेनगर येथे स्वराज प्रतिष्ठानच्यावतीने आयोजित रामजन्मोत्सव सोहळ्यात सहभागी झालेल्या महिला.

# स्वराज प्रतिष्ठानच्यावतीने दसरेनगर येथे श्रीराम जन्मोत्सव सोहळा भक्तीभावात

नगर – शहरातील दसरेनगर परिसरात स्वराज प्रतिष्ठान यांच्या वतीने २६ मार्च रोजी श्रीराम जन्मोत्सव मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. या सोहळ्याला नागरिकांचा प्रतिसाद लाभला.

कार्यक्रमाची सुरुवात प्रभू श्रीरामांच्या प्रतिमेच्या पूजनाने करण्यात आली. परिसर रामनामाच्या गजराने, भजन–कीर्तनांनी आणि धार्मिक वातावरणाने भारावून गेला होता. उपस्थित भक्तांनी मोठ्या श्रद्धेने सहभाग घेत श्रीराम जन्मोत्सवाचा आनंद लुटला.

या कार्यक्रमास आमदार संग्राम जगताप, महापौर सौ. ज्योतीताई गाडे, नगरसेविका सौ. रोशनीताईताई त्रंबके, सौ. रूपालीताई वारे, सौ. संध्याताई पवार आदी उपस्थित होते.

या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी किशोर वाणी होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन करण्यात आले. यावेळी प्रमुख उपस्थितांमध्ये बाळकृष्ण नरवडे, भाऊसाहेब आव्हाड, अजित शहाणे, महादेव साबळे, वासुदेव आव्हाड, सारंग शहाणे, तुकाराम मिसाळ, राजू गीते, योगेश जावळे, मयूर सूर्य पुजारी तसेच शेखर बनकर यांची उपस्थिती लक्षणीय होती.

कार्यक्रमादरम्यान विविध धार्मिक व सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. रामजन्माच्या पवित्र क्षणी विशेष आरती करण्यात आली व त्यानंतर प्रसादाचे वितरण करण्यात आले. लहान मुलांपासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांनी या सोहळ्यात उत्साहाने सहभाग घेतला.

स्थानिक नागरिकांनी अशा धार्मिक व सामाजिक उपक्रमांमुळे समाजात एकात्मता व संस्कारांची जपणूक होत असल्याचे मत व्यक्त केले. स्वराज प्रतिष्ठानच्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आयोजकांनी परिश्रम घेतले असून, भविष्यातही अशा उपक्रमांचे आयोजन करण्याचा संकल्प त्यांनी व्यक्त केला.

# रामनवमी निमित्त ५० किलोमीटर सायकल राईड उत्साहात

नगर – रामनवमीच्या पावन पर्वानिमित्त अहिल्यानगर सायकलिस्ट असोसिएशनतर्फे २६ मार्च रोजी नगर शहरातील छत्रपती संभाजीनगर रोडवरील महाराजा हॉटेल येथून सोलापूर रोड मार्गे दहीगाव साकत येथील प्राचीन राममंदिरापर्यंत. सायकल राईडचे आयोजन करण्यात आले होते. धार्मिक श्रद्धा, आरोग्यजागर आणि पर्यावरणपूरक जीवनशैलीचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाला नागरिकांचा प्रतिसाद लाभला.

या राईडमध्ये १५ ते ७० वयोगटातील सुमारे ६० सायकलस्वार सहभागी झाले होते. एकूण सुमारे ५० किलोमीटरचे अंतर सायकलस्वारांनी यशस्वीरीत्या पूर्ण करत आपल्या फिटनेसची प्रचिती दिली. या राईड मध्ये विविध क्षेत्रातील शासकीय अधिकारी, डॉक्टर, शिक्षक, वकील तसेच सहभागी झाले होते.'जय श्रीराम'च्या घोषणांनी संपूर्ण मार्ग दुमदुमून गेला होता. मार्गावरील नागरिकांनीही सायकलस्वारांचे स्वागत करत उपक्रमाचे कौतुक केले.



रामनवमीच्या पावन पर्वानिमित्त अहिल्यानगर सायकलिस्ट असोसिएशनतर्फे नगर शहरातील छत्रपती संभाजीनगर रोडवरील महाराजा हॉटेल येथून सोलापूर रोड मार्गे दहीगाव साकत येथील प्राचीन राममंदिरापर्यंत सायकल राईडचे आयोजन करण्यात आले होते.

## प्रभू श्रीरामांच्या आदर्शातून फिटनेस, शिस्त आणि समाजएकतेचा संदेश

दहीगाव साकत येथील प्राचीन राममंदिरात पोहोचल्यावर सर्व सहभागी सायकलस्वारांनी प्रभू श्रीरामांचे दर्शन घेतले व सामूहिक प्रार्थनेत सहभागी होत कार्यक्रमाची सांगता भक्तिभावाने करण्यात आली. धार्मिकतेसोबतच आरोग्य आणि पर्यावरणाचा संदेश देणारा हा उपक्रम सर्वांसाठी प्रेरणादायी ठरला.

या उपक्रमाच्या आयोजनासाठी असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी काटेकोर नियोजन केले होते. राईडदरम्यान सुरक्षितता, वाहतुकीचे नियम आणि शिस्त यांचा विशेष आग्रह धरत सर्व सहभागींचे मार्गदर्शन करण्यात आले. 'सायकल वापरा, आरोग्य जपा' हा संदेश प्रभावीपणे पोहोचवण्यात आयोजकांना यश आले.

यावेळी नितीन पाठक यांनी आपल्या भाषणात प्रभू श्रीरामांच्या आदर्श जीवनमूल्यांचा उल्लेख करत सांगितले की, श्रीराम हे केवळ धार्मिक श्रद्धेचे प्रतीक नसून आदर्श आचरण, संयम आणि कर्तव्यनिष्ठेचे मूर्तिमंत उदाहरण आहेत. अशा पवित्र दिवशी सायकल राईडसारख्या उपक्रमातून समाजात सकारात्मक ऊर्जा निर्माण होते. फिटनेस आणि अध्यात्म यांचा संगम घडवणारे हे उपक्रम काळाची गरज आहेत.

पुढे ते म्हणाले, आजच्या यांत्रिक जीवनशैलीत सायकलिंगसारखा साधा व्यायाम प्रकारही अत्यंत उपयुक्त ठरतो. अशा उपक्रमांमुळे युवकांमध्येच नव्हे तर सर्व वयोगटांत आरोग्याबाबत जागरूकता वाढते. तसेच समाजात एकात्मता आणि सहकार्याची भावना दृढ होते. भविष्यातही अशा उपक्रमांचे सातत्य राखले जाईल.

दरम्यान, या सायकल राईडमध्ये नागरिकांचा सहभाग लाभला. सामाजिक सलोखा, आरोग्यदायी जीवनशैली आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा हा उपक्रम नागरिकांसाठी प्रेरणादायी ठरला.

# नवीपेठेतील श्रीराम मंदिरात श्रीराम जन्मोत्सव भक्ती, उत्साह आणि जयघोषात, अखंड नामस्मरण

## भजन–कीर्तनाने परिसर दुमदुमला; हजारो भाविकांची उपस्थिती

नगर – श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ ट्रस्टच्या वतीने नवीपेठ येथील श्रीराम मंदिरात श्रीराम जन्मोत्सव अत्यंत भक्तिभाव, शिस्तबद्ध नियोजन आणि उत्साहात झाला. पहाटेपासूनच मंदिर परिसरात भाविकांची प्रचंड गर्दी उसळली होती. 'जय श्रीराम'च्या घोषणांनी आणि श्रीराम जय राम जयजय राम या अखंड मंत्रजपाने संपूर्ण परिसर भारावून गेला होता.

पहाटे ६ वाजता जलाभिषेक, दुग्धाभिषेक व देखण्या शृंगाराने कार्यक्रमाची मंगल सुरुवात झाली. आकर्षक फुलांची सजावट, रंगीबेरंगी विद्युत रोषणाई आणि अयोध्येच्या धर्तीवर उभारलेली सजावट यामुळे मंदिर परिसर दिव्य आणि प्रसन्न भासत होता. सकाळी मंगल आरतीनंतर भाविकांनी मोठ्या भक्तिभावाने दर्शन घेतले.

सकाळी ११ ते दुपारी १२ या वेळेत सामूहिक नामजप व हनुमान चालीसा पठणाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शेकडो भाविक एकसुरात मंत्रोच्चार करताना दिसले. मंत्रजपाच्या गजरात वातावरण पूर्णपणे भक्तिमय झाले होते. दुपारी बरोबर १२ वाजता प्रभु श्रीरामचंद्रांचा जन्मोत्सव सोहळा पार पडताच मंदिर परिसरात टाळ्या, घंटानाद आणि जय श्रीरामच्या जयघोषाने जल्लोष उसळला.



श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ ट्रस्टच्या वतीने नवीपेठ येथील श्रीराम मंदिरात श्रीराम जन्मोत्सव अत्यंत भक्तिभावाने साजरा करण्यात आला.

भाविकांना सुरळीत व जलद दर्शन मिळावे यासाठी ट्रस्टच्या वतीने दर्शनबारी, स्वतंत्र प्रवेश–निर्गमन व्यवस्था, मंडप, पिण्याच्या पाण्याची सोय आदी सुविधा उत्तम प्रकारे उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. स्वयंसेवकांनी शिस्तबद्ध पद्धतीने भाविकांना मार्गदर्शन करत संपूर्ण व्यवस्थापन यशस्वी केले. कार्यक्रमानंतर सर्व भाविकांना प्रसादाचे वितरण करण्यात आले.

गेल्या १९ वर्षांपासून सातत्याने राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमांतर्गत होळी पौर्णिमेपासून ३१ दिवस शहरभर सामूहिक हनुमान चालीसा पठण, भजन संध्या आणि धर्मप्रसाराचे विविध कार्यक्रम घेतले जातात.


प्रत्येक घराघरांत श्रीरामभक्तीचा संदेश पोहोचावा या उद्देशाने कार्यक्रम ादरम्यान मोफत हनुमान चालीसा पुस्तिकांचे वितरण करण्यात आले. तसेच दररोज श्रीरामचरितमानसातील चौपाई वाचन, आरती व प्रसाद वितरणाने कार्यक्रमाचा समारोप केला जात आहे.

श्रीराम जन्मोत्सवाच्या दिवशी मंदिर दिवसभर दर्शनासाठी खुले ठेवण्यात आले आहे. दिवसभरात हजारो भाविकांनी श्रीराम लल्लाचे दर्शन घेत आध्यात्मिक समाधानाचा अनुभव घेतला.

दरम्यान, आज सायंकाळी आणि रात्रीच्या सत्रात भजन, कीर्तन व आध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, राजज्योती नगर मित्र मंडळ व श्री देसर्डा परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने बुरुडगाव रोड येथे महा हनुमान चालीसा पाठ पार पडणार आहे. रात्री ८ ते १०.३० या वेळेत होणाऱ्या या कार्यक्रमात भाविकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. यंदा प्रथमच श्रीराम जय राम जयजय राम या तारक मंत्राचा संगीतमय जप हे विशेष आकर्षण ठरणार आहे.

तसेच २ एप्रिल रोजी पहाटे ६ वाजता श्री हनुमान जन्मोत्सवही याच ठिकाणी साजरा करण्यात येणार असल्याची माहिती ट्रस्टचे अध्यक्ष प्रितम मुथ्था व उपाध्यक्ष निखिल शेटीया यांनी दिली. त्यांनी या सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी स्वयंसेवक, कार्यकर्ते व भाविकांचे आभार मानले.





अयोध्येत श्रीराम मंदिरात श्रीराम यंत्र प्राणप्रतिष्ठा सोहळ्यासाठी चित्र शिल्पकार प्रमोद कांबळे कुटुंबियांसह उपस्थित होते. शेजारील छायाचित्रात त्यांनी साकारलेल्या रामायणातील प्रसंगांवर आधारित कलाकृती.

# अयोध्येत श्रीराम मंदिरात श्रीराम यंत्र प्राणप्रतिष्ठा सोहळा कार्यक्रमासाठी चित्रशिल्पकार प्रमोद कांबळे यांना सहपरिवार उपस्थितीचे विशेष निमंत्रण

नगर – गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर, हिंदू नववर्षाच्या पहिल्या दिवशी श्रीक्षेत्र अयोध्या येथील श्रीराम जन्मभूमी मंदिरात श्रीराम यंत्राची विधीवत प्राणप्रतिष्ठा सोहळा उत्साहात पार पडला. या ऐतिहासिक आणि धार्मिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण कार्यक्रमासाठी चित्रशिल्पकार प्रमोद कांबळे यांना सहपरिवार विशेष निमंत्रण देण्यात आले होते.

श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासाच्या वतीने आयोजित या सोहळ्यास देशाच्या राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, राज्यपाल आनंदीबेन पटेल, उपमुख्यमंत्री केशव प्रसाद मौर्य, उपमुख्यमंत्री ब्रजेश पाठक उपस्थित होते.

याप्रसंगी न्यासाच्या वतीने प्रमोद कांबळे यांचा विशेष उल्लेख करण्यात आला. न्यासाचे अध्यक्ष चंपत राय, खजिनदार गोविंद गिरीजी महाराज, चित्रकार पद्मश्री वासुदेव कामत तसेच रामलल्लाची मूर्ती साकार करणारे शिल्पकार अरुण योगीराज यांचीही उपस्थिती होती.

कार्यक्रमादरम्यान अरुण योगीराज, वासुदेव कामत आणि प्रमोद कांबळे यांची भेट घडली. यावेळी अरुण योगीराज यांनी प्रमोद कांबळे यांच्या शिल्पकलेचे मनापासून कौतुक करत मी त्यांना खूप पूर्वीपासून फॉलो करतो, असे उद्गार काढले.

विशेष म्हणजे, अयोध्येतील श्रीराम मंदिर परिसरात रामायणावर आधारित १८ प्रसंग साकारण्याचे महत्त्वपूर्ण काम प्रमोद कांबळे यांनी केले आहे. या शिल्पकृती प्रथम मातीमध्ये तयार करून त्यानंतर फायबर मोल्डद्वारे साकारण्यात आल्या. पुढे जयपूर येथे त्याच मॉडेलच्या आधारे दगडामध्ये मूर्ती घडवण्यात आल्या. मंदिर परिसरातील प्रदक्षिणा मार्गावर या सर्व शिल्पकृती कायमस्वरूपी स्थापित करण्यात आल्या आहेत.

या संकल्पचित्रांची रचना पद्मश्री वासुदेव कामत यांनी इतिहासतज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली केली असून त्यावरून प्रमोद कांबळे यांनी या भव्य शिल्पकृती साकारली आहे. उपस्थित मान्यवरांनी या कलाकृतींचे विशेष कौतुक केले.

प्रभू श्रीरामांची कृपा असल्यानेच हे कार्य माझ्याकडून घडले. अयोध्येतील राम मंदिरात माझी कला साकार करण्याची संधी मिळणे हे माझे भाग्य आहे. मंदिर न्यास, उत्तर प्रदेश सरकार आणि भारत सरकारने माझ्यावर दाखवलेल्या विश्वासाबद्दल मी ऋणी आहे, अशी भावना प्रमोद कांबळे यांनी व्यक्त केली.

राम मंदिर उभारणीतील त्यांच्या मोलाच्या योगदानाची दखल घेत राष्ट्रपतींच्या उपस्थितीत पार पडणाऱ्या या ऐतिहासिक सोहळ्यास सहपरिवार उपस्थित राहण्याचा मान मिळाल्याने कांबळे कुटुंबासाठी हा क्षण अत्यंत अभिमानाचा ठरला आहे.

# राधाकृष्ण महाराजांचा श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळा; नगर शहरात जय्यत तयारी सुरू : नियोजन बैठक उत्साहात

नगर – जोधपूर येथील गोवत्स श्री राधाकृष्ण महाराजांचा श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळा नगर शहरात आयोजित करण्यात आला असून त्याची जय्यत तयारी सुरू झाली आहे. या सोहळ्याची नियोजन बैठक पटेलवाडी मंगल कार्यालयात उत्साहात झाली. या बैठकीस शहरातील वैष्णव समाजातील भाविक मंडळी उपस्थित होती.

३ ते ९ एप्रिल दरम्यान दुपारी २ ते सायंकाळी ६ या वेळेत नवीन टिळक रोडवरील नंदनवन लॉन्समध्ये रामनिवास सतीशचंद्र इंदाणी आणि इंदाणी परिवाराने या कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याचे आयोजन केले आहे.

दीपप्रज्वलनाने बैठकीचा श्रीगणेशा करण्यात आला. शरद झंवर यांनी प्रास्ताविक केले. कल्पेश इंदानी व महेश इंदानी यांनी कथेच्या आयोजना संदर्भात माहिती दिली. रामेश्वर बिहाणी व बजरंग दरक यांनी प्रचार, प्रसार संदर्भात मार्गदर्शन केले.

बैठकीस श्रीगोपाल धूत, मोहनलाल मानधना, नंदलाल मणियार, राजेंद्र चोपडा, रामनिवास इंदानी, मगनभाई पटेल, प्रदीप पंजाबी आदी उपस्थित होते. यांनी उपयुक्त सूचना केल्या.

संपूर्ण वैष्णव समाज आणि नगरकरांसाठी इंदानी परिवाराने या कथा श्रवणाचा अमृत योग घडवून आणल्याबद्दल उपस्थित सर्वांनी इंदानी परिवाराचे अभिनंदन केले.

या कथा ज्ञान यज्ञ सोहळ्याचा शहरासह उपनगरातील भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन या बैठकीत करण्यात आले.



राधाकृष्ण महाराजांचा श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याची नियोजन बैठक उत्साहात झाली.



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज मंदिरात श्रीराम जन्मोत्सवानिमित्त महिलांनी पाळणा म्हणून रामनवमी उत्सव साजरा केला (छाया – विजय मते)

# गोंदवलेकर महाराज मंदिरात श्रीराम जन्मोत्सव साजरा

नगर – सावेडी उपनगरातील शिलाविहार येथील श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज मंदिरात दुपारी १२ वाजता श्रीराम नवमी निमित्त श्रीराम जन्म उत्सव सोहळा साजरा करण्यात आला.

गुढीपाडव्यापासून ते रामनवमी पर्यंत मंदिरात रोज दुपारी साडेतीन ते साडेपाच श्रीराम जय राम जय जय राम हे नामस्मरण करीत नाम जप सप्ताह आयोजित करण्यात आला होता. रामनवमीला श्रीराम जन्मोत्सव साजरा करून या सप्ताहाची सांगता करण्यात आली या राम जन्म सोहळ्यास महिला उपस्थित होते. श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज यांनी आपले आयुष्य संपूर्ण राम नामाचे महत्त्व सांगण्यात खर्च केले. या मंदिरात गेली तीस वर्षापासून अखंड हरिनाम सप्ताह, श्रीराम जन्मोत्सव उत्साहात साजरे होतात. ब्रह्मचैतन्य सेवाभावी मंडळातील सदस्य यासाठी उपस्थित असतात महाप्रसादाने सांगता करण्यात आली भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

# रामनवमी व हनुमान जयंतीनिमित्त अखंड हरिनाम सप्ताहाला उत्साहात प्रारंभ; जय श्रीराम – जय हनुमानच्या जयघोषाने गाडगीळ पटांगण परिसर दुमदुमला

नगर – नालेगाव येथील गाडगीळ पटांगणात श्री छत्रपती शिवराय तरुण मंडळ आणि पावन हनुमान व्यायाम शाळा यांच्या वतीने रामनवमी व हनुमान जयंतीनिमित्त अखंड हरिनाम सप्ताह कार्यक्रमाला उत्साहात सुरुवात करण्यात आली. पहिल्याच दिवशी सर्जेपुरा येथील दक्षिण मुखी हनुमान भजनी मंडळाच्या वतीने हनुमान चालीसा कार्यक्रम भक्तिभावाने झाला. कार्यक्रमादरम्यान जय श्रीराम व जय हनुमानच्या जयघोषाने संपूर्ण गाडगीळ पटांगण परिसर अक्षरशः दुमदुमून गेला. भाविकांनी श्रद्धेने सहभाग घेत धार्मिक वातावरणाची अनुभूती दिली.



गाडगीळ पटांगणात श्री छत्रपती शिवराय तरुण मंडळ आणि पावन हनुमान व्यायाम शाळा यांच्या वतीने रामनवमी व हनुमान जयंतीनिमित्त अखंड हरिनाम सप्ताह कार्यक्रमाला उत्साहात सुरुवात करण्यात आली. (छाया – लहू दळवी)

या धार्मिक सोहळ्यात श्री प्रभू हनुमानाचे रूप धारण केलेल्या कलाकारांनी विशेष आकर्षण निर्माण केले. भक्तांनी दर्शन घेत भावपूर्ण वातावरणात भजन–कीर्तनाचा आनंद लुटला. कार्यक्रमामुळे परिसरात धार्मिकतेची आणि उत्साहाची लहर निर्माण झाली होती.

धार्मिक कार्यक्रमांच्या माध्यमातून आपली संस्कृती जपली जात असून समाजात अध्यात्मिकतेची भावना दृढ होत असल्याचे यावेळी व्यक्त करण्यात आले. या हरिनाम सप्ताहाच्या माध्यमातून नागरिक एकत्र येऊन अध्यात्मिक वारसा पुढील पिढीकडे पोहोचवण्याचे काम होत आहे. छत्रपती शिवराय तरुण मंडळाचे अध्यक्ष दत्तात्रेय मुदगल यांनी सुमारे ३४ वर्षांपूर्वी या अखंड हरिनाम सप्ताहाची सुरुवात केली होती. तेव्हापासून आजतागायत ही परंपरा अखंड सुरू असून दरवर्षी उत्साहात साजरी केली जाते.

या कार्यक्रमात सर्व जाती–धर्मातील नागरिक सहभागी होत एकात्मतेचा संदेश देत आहेत. महिला भगिनींचीही उपस्थिती असून त्यांच्या सहभागामुळे कार्यक्रमाची शोभा अधिकच वाढली. अखंड हरिनाम सप्ताहाच्या माध्यमातून धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक एकात्मतेचा संदेश दिला जात असून, अशा उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक वातावरण निर्माण होत असल्याचे नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

# आपल्या मुलांना जीवनाचा आनंद घेऊ द्या : केदार वाळिंबे

## भगवान महावीर व्याख्यानमाला - पुष्प पाचवे

नगर - आपल्या मुलांवर आपले विचार लादून त्यांचे बालपण हरवेल असे वागू नका. त्यांना जीवनाचा आनंद घेऊ द्या, असे आवाहन शिक्षणतज्ज्ञ केदार वाळिंबे (पुणे) यांनी केले.

राष्ट्रसंत आचार्य सम्राट श्री आनंदऋषीजी महाराजांच्या ३४ व्या पुण्यस्मृतीदिनानिमित्त जैन सोशल फेडरेशनतर्फे आदर्शऋषीजी म.सा. यांच्या प्रेरणेने येथील आनंदधाममध्ये आयोजित करण्यात आलेल्या भगवान महावीर व्याख्यान मालेचे पाचवे पुष्प गुंफताना ते बोलत होते. सिमा मुनोत यांनी स्वागत केले. प्रा.प्रसाद बेडेकर यांनी परिचय करून दिला. सिमरन मुनोत यांनी आभार मानले. श्रीमती इमरतबाई मुनोत (नेवासावाला) आणि हर्ष मुनोत यांच्या हस्ते वक्त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी सुरेश कटारिया, संतोष गांधी, सपना कटारिया आदी उपस्थित होते.







राष्ट्रसंत आचार्य सम्राट श्री आनंदऋषीजी महाराजांच्या पुण्यस्मृतीदिनानिमित्त जैन सोशल फेडरेशनतर्फे आदर्शऋषीजी म.सा. यांच्या प्रेरणेने येथील भगवान महावीर व्याख्यानमालेचे पाचवे पुष्प गुंफताना शिक्षणतज्ज्ञ केदार वाळिंबे. याप्रसंगी श्रीमती इमरतबाई मुनोत (नेवासावाला) आणि हर्ष मुनोत यांच्या हस्ते वक्त्यांचा सन्मान करण्यात आला.

श्री. वाळिंबे पुढे म्हणाले, अलीकडच्या काळात मुलांना जन्म देणे हा मोठा प्रोजेक्ट मानला गेला आहे. आई वडील हे या प्रोजेक्टचे प्रोजेक्ट मॅनेजर आहेत. मुलाने कसे वागावे? कसे राहावे? अभ्यास कसा करावा? कोणत्या विषयाचा करावा? हे सगळे आई-वडील ठरवत असल्यामुळे मुलांचा विचारच केला जात नाही, अशी गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. शाळेत माझ्या मुलाला शिक्षकांनी रागवायला सुद्धा नको, अशी पालकांची भूमिका तयार झाल्याने शिक्षकांनीही मुलांची जबाबदारी घेणे बंद केले आहे.

आपल्या मुलाला काय पाहिजे? याचा विचार न करता आपल्याला काय पाहिजे ? याचा जास्त विचार केला जात असल्याने उमलणारी मुले कोमेजू लागली आहेत. त्यांना खेळण्या-बागडण्यास वेळच दिला जात नाही! शाळेमध्ये त्याचा दिवस कसा गेला ? हे ऐकून घ्यायला पालकांना वेळच नाही. आपल्या मुलाशी इतर मुलांची तुलना करताना आपल्या मुलाच्या आवडी-निवडीचा, बौद्धिक विकासाचा विचार केला जात नाही. जर्मनी, जपान, इस्त्राईल, स्पेन, फ्रान्स, इटली या जगावर तंत्रज्ञानाने राज्य करणाऱ्या देशांमधील शिक्षण मातृभाषेतूनच दिले जाते, हि वस्तुस्थिती लक्षात घेतली पाहिजे. जगातील १६ टक्के व्यापार एकटा चीन सांभाळतो मात्र चीनमधील कोणालाही इंग्रजी बोलता येत नाही. भारतामध्येच इंग्रजीचा अट्टाहास केला जातो. इंग्रजी बोलण्यातून फक्त सेल्समनच घडतो, ही वस्तुस्थिती आहे.

आपल्या घरची परिस्थिती, सामाजिक पार्श्वभूमी आणि आपली गरज लक्षात घेऊन मुलांचे शिक्षण झाले पाहिजे. गरजेच्या नसलेल्या गोष्टींमुळे समाजाचा ऱ्हास होत चालला आहे. समाजाला काय वाटेल त्याचा विचार करताना आपल्याला काय वाटेल? हे लक्षात घेणे महत्त्वाचे मानले जात नाही. सामाजिक प्रतिष्ठा जपण्यासाठी मुलांवर आपले विचार लादून त्यांना घडवण्याची धडपड करताना मुलांच्या मनाचा, मुलांमधील सुप्त कलागुणांचा विचार केला जात नाही. सर्व प्लॅनिंग पालक करतात. त्यात मुलांना सहभागी करून घेतले जात नाही. त्यातून बालपणीच मुलांचा आत्मविश्वास कमी होत चालला आहे.

विकसित भारत घडवायचा असेल तर मुलांना उमलू द्या. त्यांच्यातील सुप्त कलागुणांचा विकास होईल, याची काळजी घ्या. आपल्या कुटुंबातील आजी-आजोबांसोबत आपली मुलं राहिली तरच ती घराण्याची परंपरा, संस्कृती सक्षमपणे जपतील आणि समर्थपणे जगण्यास उभे राहू शकतील, असे श्री वाळिंबे यांनी ठामपणे सांगितले.

व्याख्यानास शहरासह उपनगरातील स्त्री-पुरूष श्रोत्यांची उपस्थिती लक्षवेधी होती.

# आनंदऋषीजी स्मृतीदिनानिमित्त २८ मार्चला आनंदधाम येथे विविध 'धार्मिक कार्यक्रम'

नगर - राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषिजी म.सा. यांच्या ३४ व्या पुण्यस्मृतिदिना निमित्ताने आनंदधाम येथे विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. सकाळी ७.३० वा. नवीपेठ जैन धर्मस्थानक येथून शांतीमार्च निघणार असुन यामध्ये महिलांनी लाल साडी व पुरुषांनी श्वेत रंगाचे कपडे घालावेत. शांती मार्च नवीपेठ स्थानक येथुन निघुन शहराच्या विविध मार्गावर धार्मिक परिक्षा बोर्ड येथे जाणार आहे. तेथील आनंद दरबार येथे अनेक साधु-साध्वींच्या उपस्थितीत सकाळी ९ वा. गुरु गुणानुवाद सभा होणार आहे. यावेळी महाराष्ट्र प्रवर्तक कुंदनऋषिजी म.सा., प्रबुध्द विचारक आदर्शऋषिजी, अलोकऋषिजी म.सा., महासती सेवाभावी सत्यप्रभाजी म.सा., दिव्य दर्शनाजी, सम्यकदर्शनाजी, कंचनकंवरजी, अर्चनाजी (मिरा), चंदनबालाजी, अनुपज्योतीजी, राजस्थानी प्रवर्तिनी सुधाजी म.सा., आभाजी म.सा. आदि साधु साध्वी संत आचार्यश्रींच्या जीवनावर प्रवचन देणार आहेत.

तसेच मानवसेवा समिती, धार्मिक परिक्षा बोर्ड, अहिल्यानगर आयोजित, मर्चंट बँक प्रायोजित रक्तदान शिबीर धार्मिक परिक्षा बोर्ड येथे सकाळी ९ ते ५ आयोजित केले आहे. या शिबीराचे उद्घाटन मर्चन्ट बँकेचे अध्यक्ष हस्तीमल मुनोत यांच्या हस्ते होणार असुन अध्यक्षस्थान धार्मिक परिक्षा बोर्डाचे अध्यक्ष नेमीचंद चोपडा (पाली, राजस्थान) भुषविणार आहेत. यावेळी आमदार संग्राम जगताप, महापौर सौ. ज्योतीताई गाडे, उपमहापौर धनंजय जाधव, मनपा आरोग्य अधिकरी, सर्व आजी माजी नगरसेवक, मर्चन्टस बँकेचे सर्व संचालक उपस्थित राहणार आहेत, सुमारे २००० बाटल्या रक्त संकलन करण्याचा मानस संयोजकांनी व्यक्त केला आहे. तसेच सायंकाळी ७ वा. संगीतकार राम शंकर व इंडियन आयडॉल फेम स्नेह शंकर यांचा मंत्रमुग्ध करणारा भक्तीसंध्या कार्यक्रम होणार आहे. दुपारी १२ ते ३ या वेळेत व्यापारी मित्र मंडळातर्फे गौतमप्रसादीचे आयोजन करण्यात आलेले आहे. तरी २८ मार्च रोजी भाविकांनी उपस्थित राहुन कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आलेले आहे.

राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषिजी म.सा. यांच्या पुण्यस्मृतीस अभिवादन करण्यासाठी देशभरातून जैन साधु-साध्वीसह भाविक नगरमध्ये दाखल झाले आहे.

# सकल जैन समाजातर्फे भगवान महावीर जन्मकल्याणक (जयंती) निमित्त ३१ मार्च रोजी विविध कार्यक्रम

## शोभा यात्रा, चौक सजावट, रांगोळी स्पर्धा, सायंकाळी भक्तीसंध्या



नगर - संपूर्ण जगाला अहिंसा व शांतीचा संदेश देणाऱ्या भगवान महावीर स्वामी जन्मकल्याणक (जयंती) ३१ मार्च रोजी साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्त अहमदनगर सकल जैन समाजातर्फे शहरात शोभायात्रा, चौक सजावट, रांगोळी स्पर्धा, भक्तीसंध्या अशा भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती कापडबाजार जैन मंदिराचे अध्यक्ष सुभाष मुथा यांनी दिली.

महावीर जयंतीदिनी ३१ मार्च रोजी सकाळी ७.३० वाजता कापड बाजार जैन मंदिरापासून शोभायात्रेला प्रारंभ होणार आहे. या शोभायात्रेत सनई, नगारा, चौघडा, बॅण्ड पथक, घोडेस्वार, उंट स्वार, डोक्यावर मंगल कलश घेतलेल्या मुली, विविध वेशभूषा परिधान केलेले लहान मुले, मुली, त्यानंतर पांढरे वस्त्र परिधान केलेले पुरुष व केसरी, पिवळ्या, लाल साड्या परिधान केलेल्या महिला भगिनी सहभागी होणार आहेत. भगवान महावीर स्वामींची प्रतिमा असलेले वाहन, रथ व शेवटी अनुकंपा (प्रसाद)ची गाडी असणार आहे. शोभायात्रा कापडबाजार, अर्बन बँक चौक, घुमरे गल्ली, गुजर गल्ली, आदेश्वर जैन मंदिर, लक्ष्मी कारंजा, चितळे रोड, नेता सुभाष चौक, नवीपेठ जैन स्थानक, घासगल्ली, महात्मा गांधी रोड, तेलीखुंट चौक, दाळमंडई, आडतेबाजार, गंजबाजार, सराफबाजार, जुना कापडबाजार, पलक ज्वेलर्स समोरून खिस्तगल्ली, बुरूडगल्ली, जुनी वसंत टॉकीज, सहकार सभागृह मार्गे धार्मिक परीक्षा बोर्ड आनंदधाम येथे जाईल.

शोभायात्रेनंतर आनंदधाम येथे महाराष्ट्र प्रवर्तक कुंदनऋषीजी म.सा., प्रबुध्द विचार आदर्शऋषीजी म.सा., संस्कार दिवाकर अलोकऋषीजी म.सा., साध्वीजी भगवंत त्रिशलाकंवरजी म.सा., सत्यप्रभाजी म.सा., चंदनबालाजी म.सा., दिव्यदर्शनाजी म.सा., सम्यकदर्शनाश्रीजी म.सा., विश्वदर्शनाजी म.सा., ज्ञानप्रभाश्रीजी म.सा., कंवरजीश्री म.सा., उदयप्रभाजी म.सा., अर्चनाश्रीजी म.सा., विचक्षणाजी म.सा., सुयशाजी म.सा., अमितज्योतीजी म.सा., विपुलदर्शनाश्रीजी म.सा., अभाश्रीजी म.सा., प्रणवदर्शनाश्रीजी म.सा. आदी साधू साधूसाध्वीजींच्या उपस्थितीत भगवान महावीर स्वामींच्या जीवन चरित्रावर प्रवचन तथा गुणानुवाद होईल. कार्यक्रमानंतर गौतम प्रसादीची व्यवस्था करण्यात आली आहे.

महावीर जयंतीनिमित्त नगर शहरात चौक सजावट स्पर्धाही होणार आहे. याशिवाय रांगोळी स्पर्धाही होणार आहे. यात प्रथम बक्षिस ११०० रुपये, व्दितीय बक्षिस ९०० रुपये, तृतीय बक्षिस ७०० रुपये व ३०० रुपयांची सहा उत्तेजनार्थ बक्षिसे ठेवण्यात आली आहे. इच्छुकांनी आपली नाव नोंदणी कापडबाजार जैन मंदिरात करायची आहे. शोभायात्रेत सुरूवातीपासून शेवटपर्यंत सहभागी होणाऱ्या भाविकांसाठी प्रमुख मार्गावर तीन ठिकाणी लकी ड्रॉ कुपनचे आयोजन करण्यात आले आहे. यातील भाग्यवान विजेत्यांना प्रथम बक्षिस ४०० रुपये, व्दितीय बक्षिस ३०० रुपये तर तृतीय बक्षिस २०० रुपये देण्यात येईल.

रांगोळी स्पर्धेचे परीक्षणशैला गांधी, सौ. संगिता गांधी व सौ. सरोज कटारिया करणार आहेत. डोक्यावर कलश (घडा) घेणाऱ्या लहान मुलींसाठीही बक्षिसे ठेवण्यात आलेली आहेत. जैन बांधवांनी यादिवशी आपल्या घरावर जैन ध्वज लावून घरासमोर रांगोळी काढून शोभायात्रेत सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. जैन ध्वज कापडबाजार जैन मंदिरात मोफत उपलब्ध आहे. चौक सजावट स्पर्धेत प्रथम बक्षिस ३१०० रुपये, व्दितीय बक्षिस २१०० रुपये, तृतीय बक्षिस १५०० रूपये असेल तसेच ३ उत्तेजनार्थ बक्षिसे प्रत्येकी ७०० रुपये देण्यात येतील.

याच दिवशी सायंकाळी ७ वाजता आनंदधामच्या प्रांगणात जैन सोशल फेडरेशनतर्फे भक्तीसंध्या कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमांना उपस्थित राहण्याचे आवाहन कापड बाजार जैन मंदिराचे अध्यक्ष सुभाष मुथा, ओसवाल पंचायत सभेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया, श्रावक संघाचे अध्यक्ष हस्तीमल मुनोत, बडीसाजनचे अध्यक्ष प्रेमराज बोथरा, धार्मिक परीक्षा बोर्डचे सेक्रेटरी संतोष बोथरा, दिगंबर जैन समाजाचे महावीर बडजाते, नरेंद्र लोहाडे, अॅड.संतोष भोसे, संजय महाजन, महावीर गोसावी, जैन गुजराथी समाजाचे अध्यक्ष डॉ. विनयभाई शहा, एच.व्ही.शहा, कमलेशभाई गांधी, मयुरभाई मेहता, डॉ. प्रकाश कांकरिया, माणिकनगर जैन मंदिराचे अशोक मुथा व तलकशीभाई सावला, ऑल इंडिया जैन कॉन्फरन्सचे ट्रस्टी अशोक (बाबूशेठ) बोरा, वात्सल्य संस्थेचे अध्यक्ष अजित बोरा, भाजपचेवसंत लोढा, महावीरनगर श्री संघाचे अध्यक्ष अनिल कटारिया, केडगावचे पोपटलाल शिंगी, आगरकर मळा श्री संघाचे अध्यक्ष अभय कोठारी, उपाध्यक्ष सुरेश पगारिया, विनायकनगर श्री संघाचे सेक्रेटरी नितीन कटारिया, सावेडी श्री संघाचे अध्यक्ष किशोर गुगळे, जवाहरलाल कटारिया व शांतीलाल बोरा, सिव्हिल हडको जैन मंदिराचे अध्यक्ष प्रफुलभाई मेहता, सी.ए.राजेशभाई शहा, सारसनगर संघाचे अध्यक्ष कांतीलाल गांधी, सिव्हिल हडको श्रावक संघाचे विजय गुगळे, धार्मिक परीक्षा बोर्डचे उपाध्यक्ष आनंदराम मुनोत, अखिल भारतीय जैन कॉन्फरन्सचे उपाध्यक्ष बाबूशेठ लोढा, बोर्ड सेक्रेटरी संतोष गांधी, मर्चंट बँकेच्या संचालिका मिनाताई मुनोत व प्रमिलाताई बोरा, जैन सोशल फेडरेशनचे सचिन डुंगरवाल, सी.ए. महेश भळगट, अमोल कटारिया, गणेश कांकरिया, अमोल कोठारी, विशाल भंडारी, महावीर कटारिया, सीए अभय कटारिया, जैन ओसवाल पतसंस्थेचे चेअरमन अभय पितळे, व्हाईस चेअरमन शैलेश गांधी व सर्व पदाधिकारी, कापड बाजार जैन मंदिर ट्रस्टी मंडळ, जैन मंदिर सिमंधर स्वामी भक्त मंडळ, भिंगार, केडगाव, सावेडी व सर्व उपनगर, नगरमधील भारतीय जैन संघटना, जैन सोशल फेडरेशन, जय आनंद फौंडेशन, श्री महावीर प्रतिष्ठान, सकल राजस्थानी युवा मंच, जैन ओसवाल युवक संघ, बडीसाजन ओसवाल युवक संघ व जैन संघाच्या पदाधिकाऱ्यांनी कार्यक्रमास उपस्थित रहावे असे आवाहन केले आहे. जैन ध्वज (झेंडा) कापड बाजार जैन मंदिरात विनामूल्य उपलब्ध आहे. चौक सजावट, रांगोळी स्पर्धा, लकी ड्रॉ विजेते, लहान मुला मुलींची बक्षिसे आनंदधाम येथील कार्यक्रमात देण्यात येतील अशी माहिती जैन मंदिरचे अध्यक्ष सुभाष मुथा यांनी दिली.


## अहिल्यानगर छावणी परिषद, अहिल्यानगर
## रसवंती गृहाचा जाहिर लिलाव सूचना

Ahmednagar

तमाम नागरिकांना कळविण्यात येते की, या जाहिर लिलाव सूचनेद्वारे अहिल्यानगर छावणी परिषद कार्यालयामार्फत उसाचा रस विक्रीसाठी स्टॉलचे पॉइंट ठेक्याने देण्याकरिता मोहरबंद कोटेशन मागविण्यात येत आहेत.

सदर कोटेशन फॉर्म, नियम व अटी तसेच रसवंती गृहाच्या लिलावात सहभागी होण्यासाठी भरावयाची रक्कम, लिलावाची तारीख व ठेक्याचा कालावधी इत्यादी बाबी खालील तक्त्यात नमूद केल्या आहेत. लिलावाच्या सविस्तर अटी व शर्ती कार्यालयीन वेळेत कार्यालयात पाहावयास मिळतील, याची नोंद घ्यावी.

| अ. क्र. | तपशील | ठेक्याचा कालावधी | कोटेशन फॉर्म जमा करण्याचा कालावधी | अनामत रक्कम व फॉर्म फी |
|---|---|---|---|---|
| १ | **उसाचा रस विक्रीसाठीचे पॉइंट** १) एम. जी. रोड (भुत बंगल्याशेजारी) २) राम मंदिराजवळ ३) शुक्रवार बाजार | दिनांक ०१/०४/२०२६ ते ३०/०९/२०२६ | दिनांक २७/०३/२०२६ ते ३०/०३/२०२६ दुपारी ३.०० वाजेपर्यंत (कार्यालयीन वेळेत) | अनामत रक्कम : रु.२०००/- फॉर्म फी : रु. २२४/- (जी.एस.टी. सह) |

**अटी व सूचना :** १. लिलाव मंजूर करण्याचा अथवा लिलाव रद्द करण्याचा सर्व अधिकार कार्यालय राखून ठेवत आहे.

२. रसवंती गृहाच्या लिलावात सहभागी झाल्यानंतर एका व्यक्तीस एकच रसवंती गृह घेता येईल.

३. लिलावात निश्चित केलेल्या ठिकाणांव्यतिरिक्त इतर कोणत्याही ठिकाणी कोणीही रसवंती गृह लावल्यास त्यांच्याविरुद्ध जप्तीची कारवाई करण्यात येईल.

**सही/-**
मुख्य कार्यकारी अधिकारी
छावणी परिषद, अहिल्यानगर
**(पल्लवी विजयवंशी)**

क्र. अहि./राजस्व/ज्युस स्टॉल/२०२५-२६
छावणी परिषद, अहिल्यानगर
दि. २५/०३/२०२६



## जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टांत नमूद केलेली मिळकतीबाबत सदर नोटीस प्रसिद्ध करणार **मोहंमद याकुब इस्माईल बागवान व इतर** रा. पंचपीर चावडी, अहिल्यानगर मो.नं.९४२३७८५३७८ यांचे प्रत्यक्ष हितसंबंध असून सदरची मिळकत ही वडीलोपार्जीत असून सदर मिळकतीस नोटीस देणार यांची आई व इतर बहिणी यांची नावे जाणीवपूर्वक सिटी सर्व्हे रेकॉर्डला वारस म्हणून लावली गेलेली नाहीत व त्यांचा हक्क डावललेला आहे. सदर मिळकतीबाबत दि. २६/७/१९७६ साली सदर जागेच्या खरेदीकामी आणि म्युनिसिपल कॉर्पोरेशन, नगरपालिका येथील व्यवहार पुर्ण होणेकामी रक्कम रु.४०००/- नोटीस देणार यांनी (१) मेहबुबभाई करीमभाई बागवान, (२) महंमद उस्मान मुतवल्ली गुलाम रसुल बागवान, (३) शेख इब्राहिन यासीनभाई बागवान यांनी त्यावेळेस बॉन्ड पेपरवर सदरील मिळकतीपैकी ४ खण जागा त्यांचे ताब्यात दिली आहे व तेव्हापासून मिळकतीचा ताबा नोटीस देणार यांचाच आहे. तसेच सदर मिळकतीचे अद्याप पावेतो कोणतेही कायदेशीर वाटप झालेले नाही. सदर परिशिष्टात नमूद केलेली मिळकत ही कुठलेही वाटप झालेले नसल्याने व चतु:सिमा निश्चीत नसल्याने तिचे तुकडे करुन विक्री करणे शक्य नाही व कायदेशीर होणार नाही. याउपरही परिशिष्ट मिळकतीतील क्षेत्राचे वाटप व चतु:सिमा निश्चीत न करता मिळकत विक्री केल्यास खरेदी घेणारास क्षेत्राचा ताबा मिळणार नाही व खरेदीखत हे बेकायदेशीर व पोकळीस्त ठरणार आहे. याउपरही सदर परिशिष्ट मिळकतीतील काही क्षेत्र मिळकतीचे सहहिस्सेदार यांची फसगत करुन विक्री करण्याचे प्रयत्न चालू असून त्याबाबत व्यवहार करण्याचा प्रयत्न केला जात असल्याची ठोस माहिती नोटीस देणार यांना प्राप्त झालेली आहे. **तरी सदर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, परिशिष्टात नमूद केलेली मिळकतीचे खरेदीखत, साठेखत, करार, गहाण, दान, बक्षिसपत्र अगर अन्य हस्तांतरचे व्यवहार कोणीही करु नये, तसे केल्यास खरेदी घेणारास मालकी हक्क प्राप्त होणार नाही व प्रत्यक्ष क्षेत्राचा ताबा मिळणार नाही. याउलट गुंतागुंत परिस्थिती निर्माण होऊन झालेला व्यवहार हा पोकळीस्त होणार आहे. तरी सदर गटातील इतर सह हिस्सेदारांच्या संमती व मान्यतेशिवाय कोणीही कुठलेही प्रकारे हस्तांतराचा व्यवहार करु नये. सबब कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध केली असे. परिशिष्ट जिल्हा अहिल्यानगर, तालुका अहिल्यानगर पैकी पिरशाखुंट येथील सि.स.नं. २२८३, क्षेत्र ११७ चौ.मी. यावरील जुने बांधकाम असलेली मिळकत. येणेप्रमाणे मिळकत वागणुकीच्या व वहीवाटीच्या हक्कासहीत काही एक राखून न ठेवीता तदंगभुत वस्तुसहीत. दिनांक : २६/०३/२०२६**

**नोटीस देणार- मोहंमद याकुब इस्माईल बागवान व इतर**
**रा. पंचपीर चावडी, अहिल्यानगर मो.नं. ९४२३७८५३७८**




वाडिया पार्क येथे स्व. अरुणकाका जगताप यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्याबाबत महापौर ज्योतीताई गाडे यांना निवदन देताना नगरसेवक निखील वारे आदी. (छाया - लहू दळवी)

# वाडिया पार्क येथे स्व. अरुणकाका जगताप यांचा पूर्णाकृती पुतळा उभारावा

## 'स्वच्छ शाळा सुंदर शाळा' स्पर्धा व स्मृतिप्रीत्यर्थ उद्यान उभारण्याची मागणी, नगरसेवक निखिल वारे यांचे महापौर ज्योतीताई गाडे यांना निवेदन

नगर - स्व. आमदार अरुणकाका जगताप यांच्या जयंतीनिमित्त शहरात विविध सामाजिक उपक्रम राबविले जात असताना, त्यांच्या स्मरणार्थ महानगरपालिकेमार्फत विविध उपक्रम राबविण्याची मागणी नगरसेवक निखिल वारे यांनी महापौर ज्योतीताई गाडे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. २५ मार्च रोजी स्व. अरुणकाका जगताप यांच्या जयंतीचे औचित्य साधून शहर व उपनगरांमध्ये विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले. त्याच पार्श्वभूमीवर महानगरपालिकेनेही त्यांच्या कार्याचा गौरव राखण्यासाठी विशेष उपक्रम राबवावेत, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

स्व. अरुणकाका जगताप यांना स्वच्छतेची विशेष आवड होती. त्यामुळे महानगरपालिका हद्दीतील सर्व शाळांमध्ये स्वच्छ शाळा सुंदर शाळा हा उपक्रम राबविण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेबाबत जागरूकता निर्माण होऊन शाळा व परिसर स्वच्छ राहण्यास मदत होईल. स्पर्धेचे आयोजन करून गुणवंत शाळांना रोख पारितोषिक व सन्मानचिन्ह देण्यात यावे. या उपक्रमासाठी आवश्यक खर्च सुजयदादा विखे पाटील मित्र मंडळ उचलण्यास तयार असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

स्व. अरुणकाका जगताप यांचे सामाजिक कार्य नगरकरांच्या कायम स्मरणात राहावे, यासाठी शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या वाडिया पार्क चौकात त्यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्यात यावा, अशी प्रमुख मागणी करण्यात आली आहे. या पुतळ्यामुळे त्यांच्या कार्याची आठवण पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचेल व नागरिकांना प्रेरणा मिळेल, असेही निवेदनात म्हटले आहे. महानगरपालिका हद्दीत स्व. अरुणकाका जगताप यांच्या स्मरणार्थ आधुनिक व सुसज्ज असे उद्यान विकसित करण्यात यावे, अशीही मागणी करण्यात आली आहे. या उद्यानामध्ये हिरवाई, शांतता व निसर्ग सौंदर्य जपले जावे. फाऊंटन, कारंजे, विविध औषधी वनस्पतींची लागवड, ज्येष्ठ नागरिकांसाठी जॉगिंग ट्रॅक तसेच लहान मुलांसाठी अत्याधुनिक खेळणी बसविण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला आहे. स्व. अरुणकाका जगताप यांच्या जयंतीचे औचित्य साधून शहरात त्यांच्या कार्याची आठवण जपणारे आणि नागरिकांना प्रेरणा देणारे उपक्रम राबवावेत, अशी मागणी नगरसेवक निखिल वारे यांनी केली आहे.

यावेळी स्थायी समिती सभापती सुभाष लोंढे, उपसभापती वर्षा सानप, नगरसेवक बाबु नागरगोजे, मनोज दुल्लम, रेवन्नाथ पवार, दत्त गाडळकर, अनिल धवन, जितू गंभीर, करण काळे, महेश लोंढे, सुजय मोहिते, मोहित पंजाबी, विशाल नाकाडे, आशा डागवले, सुनिता फुलसौंदर, गीतांजली काळे, संध्या पवार, सुजाता पडोळे, सुनीता कांबळे, वर्षा काकडे, सुनीता भिंगारदिवे, मयुरी जाधव, कमल भोसले, अश्विनी लोंढे, आशाताई कातोरे, अनिता शेटीया, रोशनी त्रिंबके, आशाताई कातोरे, कमल कोतकर, पोर्णिमा गव्हाळे, शितल ढोणे, सोनाबाई शिंदे, मीना चोपडा आदींसह नगरसेवक उपस्थित होते.


## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्ठात नमुद केलेली शॉप मिळकत विद्यमान मालक **१. शब्बीर हुसेन शेख, २. रफिक हुसेन शेख, रा. दर्गा दायरा रोड, क्लासिक कॉलनी, अहिल्यानगर/अहमदनगर.** यांचे मालकी वहिवाटीची आहे. सदर शॉप मिळकत विक्री करण्याचा करार करुन आमचे अशिलांबरोबर कायमखुष खरेदी देण्यांचे ठरवून आमच्या अशिलाकडून विसाराची रक्कम स्विकारलेली आहे. तसेच सदर शॉप मिळकतीवर कोणत्याही प्रकारचे कर्जाचा बोजा नसून सदर शॉप मिळकत निर्वेध, निजोखमी असल्याबाबत आमचे अशिलास विश्वास व भरोसा दिलेला आहे.

परंतु कोणाचीही तक्रार राहु नये म्हणून या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, सदर मिळकतीबाबत कोणतेही चालू वाद असल्यास अथवा साठेखत, खरेदीखत, गहाणखत, दान, वारस हक्क, बक्षिसपत्र, नोटरी दस्त,मनाईहुकुम, दावा कोर्ट कारवाई बँक बोजा सोसायटी राईटस अन्य वस्त्र लिज अथवा अगर कोणताही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास संबंधीताने ही नोटीस प्रसिध्द झाले पासून ७ **दिवसांचे** आत खालील दिलेल्या पत्यावर संपूर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर शॉप खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहे असे समजण्यांत येईल.

**परिशिष्ट : मिळकतीचे वर्णन** - जिल्हा तुकडी अहिल्यानगर/अहमदनगर पो.तु.ता. नगर पैकी अहिल्यानगर/अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील **मौजे भिंगार येथील स. नं. ३४५/१ मधील प्लॉट नं. २ चे क्षेत्र २५५.०० चौ. मी. सदर प्लॉटवर मंजूर प्लॅनप्रमाणे आर.सी.सी. स्ट्रक्चर्स फ्रेममध्ये बांधकाम झालेले 'अभिनव अपार्टमेंट' या अपार्टमेंट मधील तळ मजल्यावरील दुकान नं. ४ याचे क्षेत्रफळ ६.०० चौ. मी.** असुन या संपुर्ण शॉप मिळकतीबाबत.

**यांसी चतुःसीमा -**
पूर्वेस : जीना
दक्षिणेस : रोड
पश्चिमेस : दुकान नं.५
उत्तरेस : प्लॉट नं.१

दि. २६/०३/२०२६,
अहमदनगर.

ॲडव्होकेट
नाजीम अहमद इस्माईल शेख
कुरेशी फैजान फारुक
जुन्या कलेक्टर ऑफिसशेजारी,डावरेगल्ली,
अहमदनगर, मो : ९८८१४३१८६०, ७२७६२५२४७८


# उद्योगांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात

## जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया यांचे निर्देश, जिल्हा उद्योग मित्र समितीच्या कामाचा आढावा



जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा उद्योग मित्र समितीच्या कामाचा आढावा घेताना जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया.

नगर - जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रातील उद्योगांना अडथळा ठरणाऱ्या बाबी दूर करण्यासाठी अधिकाऱ्यांनी समन्वयाने काम करून उद्योगांना मूलभूत सुविधा देण्यावर अधिक भर देण्याचे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा उद्योग मित्र समितीच्या कामाचा आढावा घेताना ते बोलत होते. बैठकीस जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक दीपक शिवदास, औद्योगिक विकास महामंडळाचे विभागीय अधिकारी गणेश राठोड, उद्योग अधिकारी श्याम बेनके, महावितरणचे अधीक्षक अभियंता रमेशकुमार पवार, औद्योगिक संघटनांचे प्रकाश गांधी, अरविंद पारगावकर, संतोष बोथरा, नितीन हासे आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले, औद्योगिक क्षेत्रातील रस्ते, प्रकाशयोजना व इतर सुविधा सुधारण्यासाठी रोड फर्निचरची कामे येत्या महिनाभरात पूर्ण करण्यात यावीत. औद्योगिक वसाहतींमध्ये उभारण्यात आलेल्या अनधिकृत टपऱ्या तातडीने हटवाव्यात. आवश्यक असल्यास पोलीस प्रशासनाची मदत घेण्याची सूचनाही त्यांनी केली.

तसेच, कामगारांच्या आरोग्याच्या दृष्टीने औद्योगिक क्षेत्रात रुग्णालय उभारण्याचा प्रस्ताव महत्त्वाचा असून त्याचा पाठपुरावा करण्यात यावा. केडगाव औद्योगिक वसाहतीत कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस गस्त वाढविण्यात यावी. भाळवणी व केडगाव औद्योगिक वसाहतीतील विद्युत समस्यांची तातडीने सोडवणूक करण्यात यावी आणि औद्योगिक क्षेत्रातील पर्यावरणीय संतुलन राखण्यासाठी हवा गुणवत्ता मापन यंत्र कार्यान्वित करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. या बैठकीस संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

